प्रकरण ३ रे

# बाळ फोंडके यांचे वाङ्मयीन चरित्र

प्रकरण ३ रे

# बाळ फोंडके यांचे वाङ्मयीन चरित्र

**प्रास्ताविक :-**

मराठीतील प्रसिद्ध विचारवंत, समीक्षक, पत्रकार, विज्ञानकथाकार आणि विज्ञानक्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून डॉ.बाळ फोंडके ख्यातनाम आहेत. डॉ.गजानन पुरूषोत्तम फोंडके हे त्यांचे मूळ नाव आहे. त्यांचा जन्म २२ एप्रिल १९३० रोजी सोलापूर येथे झाला असून त्यांचे शिक्षण एम.एस्सी फिजिक्समध्ये तसेच पीएच.डी. बायो-फिजिक्समध्ये लंडन युनिर्व्हसिटीतील आहे. त्यांचे १०० पेक्षा जास्त संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत. तसेच त्यांची इंग्रजीमध्ये -७०, मरांठीत -२८ व हिंदीत - २ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.त्याचप्रमाणे त्यांनी भाभा अनुसंशोधन केंद्रामध्ये २३ वर्षे संशोधक म्हणून नोकरी केलेली आहे.

## १. बाळ फोंडके कृतीशील कलावंत :-

डॉ.बाळ फोंडके हे 'सायन्स टुडे' या दर्जेदार मासिकाचे संपादक तर 'महाराष्ट्र टाइम्स' व 'द इकॉनॉमिक टाइम्स' या दैनिकांचे वरिष्ठ संपादक होते. त्यामुळेच त्यांच्या लेखनाला सदयस्थितीतील बहुविविधतेचे परिमाण लाभलेले दिसून येते. डॉ.बाळ फोंडके यांना इंदिरा गांधी पुरस्कार, वीर सावरकर पुरस्कार, भारत सरकार, महाराष्ट्र सरकार व महाराष्ट्र साहित्य परिषद यासारखे विविध पुरस्कार मिळाले आहेत.

डॉ.फोंडके हे पत्रकारही आहेत. पत्रकारितेच्या व्यवसायामुळे येणारी बहुश्रुतता, तत्परता, तात्कालिकता आणि कमीत कमी शब्दात पण अतिशय वाचनीय शैलीत आशयघनता कशी आणायची याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे. एकाच वेळेस प्रयोगशाळेत आणि साहित्यसृष्टीत, विज्ञानसुत्रात आणि वाङ्मयात संचार करणे सोपे नाही. डॉ.बाळ फोंडके यांना ती विलक्षण कला अवगत झालेली दिसते. तसेच त्यांच्याकडे वाङ्मयीन सर्जनशीलता दिसून येते. डॉ.फोंडके यांचे विविध शास्त्राचे ज्ञान आणि आजूबाजूच्या सर्वकष वास्तवाचे भान यामुळे त्यांच्या कथांना त्रिमितीच्या पलीकडे परिमाण लाभलेले दिसून येते.

डॉ.फोंडके यांनी अन्य देशातील आणि भाषातील श्रेष्ठ विज्ञानकथांचा परिचयही मराठी वाचकांना करून दिलेला दिसतो. त्यांच्या कथांचे अनुवाद जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, इटालियन, हिंदी,

बंगाली, ओरिसा, कन्नड अशा विविध भाषांमध्ये झालेले आहेत. 'धर्मभास्कर' या मासिकात त्यांनी २० वर्षे लेख लिहिले आहेत.

डॉ.फोंडके यांना 'इंद्रधनुष्य', 'ती आणि तो', 'ग्यानबाचे विज्ञान' ही पुस्तके आवडतात. पु.ल.देशपांडे हे त्यांचे आवडते लेखक आहेत. तसेच डॉ.भाभा हे त्यांचे आदर्श आहेत. डॉ.फोंडके यांना क्रिकेटचे सामने तसेच चित्रपट पाहायला आवडतात. वाचन हा तर त्यांचा आवडता छंद आहे. त्यांनी ना.सी.फडके, वा.ल.कुलकर्णी यांची बरीच पुस्तके वाचली आहेत.

डॉ.फोंडके हे स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाचे विज्ञान कथाकार आहेत. विज्ञानक्षेत्रातील हरतऱ्हेचे अनुभव, काल्पनिकता, कलात्मकता, वास्तवता यांचे चित्रण त्यांनी साहित्यात केलेले दिसते. विज्ञान कथालेखक म्हणून कलात्मकदृष्ट्या आपला वेगळेपणा ते प्रकट करतात. त्यांच्या कथा विलक्षण व सुशिक्षित वर्गाच्या मन:स्थितीवर आणि विचार प्रक्रियेवर प्रकाश टाकणाऱ्या दिसतात. त्यांनी विज्ञानकथेचे  गुंतागुंतीचे दर्शन अतिशय स्पष्ट आणि सुंदर पद्धतीने केलेले दिसते.

डॉ. फोंडके हे राजीव गांधी रिसर्च सेंटर दिल्ली येथे १० वर्षे कार्यरत होते. तसेच ते नॅशनल बुक ट्रस्ट चे चेअरमन देखील होते. विज्ञान परिषद व विश्वकोश मंडळाचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. त्याचप्रमाणे विज्ञानविषयक विविध व्याख्याने, चर्चासत्र, संमेलन यामध्येही ते सहभाग घेतात.

डॉ. बाळ फोंडके यांच्याविषयी महाराष्ट्र टाइम्सचे संपादक कुमार केतकर यांनी म्हटले की, "मी डॉ. फोंडके यांना सुमारे २९ वर्षे ओळखतो आहे आणि त्या अदृश्य आत्मचरित्राशी माझी जवळून ओळख आहे. संगीतापासून संगणक शास्त्रापर्यंत, राजकारणापासून ते समाजकारणापर्यंत, भारतीय सांस्कृतिक परंपरापासून ते पाश्चिमात्य वैचारिक प्रवाहापर्यंत अनेक लाटांवर ते वावरू शकतात.कुणी जर असे म्हटले की, या कथांमधून अदृश्यपणे बाळ फोंडके यांचे आत्मचरित्र वावरते आहे, तर ते म्हणणे वास्तवाला फारसे सोडून नसेल." [१]

तात्पर्य, अशारितीने डॉ.बाळ फोंडके  यांचे व्यक्तिमत्त्व हे अष्टपैलू आहे. त्यांनी साहित्य, विज्ञान, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रात अतुलनीय कार्य केले आहे. त्यांना विविध शास्त्राचे ज्ञान असल्याने त्यांच्या लेखनात वास्तविकता दिसते. वैज्ञानिक व संशोधक असूनही डॉ.बाळ फोंडके हे उत्कृष्ठ विज्ञान साहित्यिक म्हणून ओळखले जातात.

## २. बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथा लेखनामागील प्रेरणा व भूमिका :-

डॉ.बाळ फोंडके यांनी वैज्ञानिक, पत्रकार, विज्ञानकथाकार अशा वेगवेगळ्या क्षेत्रात कामगिरी केली आहे. डॉ. फोंडके यांनी 'उजव्या सोंडेचा गणपती' ही पहिली विज्ञानकथा लिहली तर त्यांच्या 'सदाशिवरावाचा तोतया' या कथेला मराठी विज्ञान परिषदतर्फे उत्कृष्ठ विज्ञानकथेचे पहिले पारितोषिक मिळाले. या कथेच्या यशामुळे त्यांना विज्ञानकथेचे लेखन अधिक उत्साहाने करण्यास आत्मविश्वास मिळाला. संशोधन, संपादन, लेखन, वाचन, विचारमंथन, चर्चा, यातून त्यांनी आपल्या विज्ञानकथा लेखनातील सातत्य वाढविले. विविध वैज्ञानिक शोधामुळे, शास्त्रीय सत्यामुळे (सिद्धांतांमुळे) कथेला स्वतंत्र विषय सुचत गेले. त्याला आशय पुरविण्याचे काम त्यांच्यातील लेखकीय गुणवत्तेने केले. त्यामुळे ते एक गुणवान विज्ञानकथालेखक म्हणून नावारूपास आले. विज्ञानकथालेखनाचे कौशल्य आणि ललित कथालेखनाची शैली याचा ते सुरेख वापर करतात.

डॉ.बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथांचे विषय व त्यातील विज्ञान हे नाविन्यपूर्ण असे आहे. लहानपणापासून त्यांना वाचनाची आवड असल्याने त्यांना विविध विषयाचे शास्त्राचे ज्ञान व वास्तव परिस्थितीची जाण असलेली दिसून येते. बाळ फोंडके यांना सततच्या वाचनातून, चिंतनातून, अभ्यासातून प्रेरणा मिळत गेली. त्यांनी अनेक विज्ञानकथासंग्रह लिहले. तसेच त्यांनी भूगोल, खगोल, पशू-पक्षी, आपले पूर्वज, अंतराळ यांची माहिती देणारी, विज्ञानाची नवलाई सांगणारी पुस्तके लिहली आहेत. अलिकडे त्यांची 'दृष्टिभ्रम' ही लघुकादंबरी प्रकाशित झाली आहे. तसेच 'व्हेन', 'सायबर कॅफे' ही त्यांची आगामी पुस्तके आहेत.

"विज्ञानकथा या केवळ मनोरंजनात्मक परीकथा नसून भीषण आणि विद्रुप वास्तवांच भेदक चित्रण करणाऱ्या साहित्याच्या मुळप्रवाहाशी नाळ जुळलेल्या वास्तवकथा आहेत. तेव्हा या आभासी वास्तवाचा हा खराखुरा फेरफटका केला तरच त्या वास्तवात टिकून राहण्याचे उपाय आपण शोधून काढू शकू. ह्या धारणेने बाळ फोंडके विज्ञानकथांकडे पाहतात."[२]

बाळ फोंडके यांच्या मते विज्ञानसाहित्याविषयी सर्वसामान्यांच्या मनात उपजत आवड निर्माण केली पाहिजे. त्यासाठी तसे वातावरण तयार करणे आवश्यक आहे. अशा वातावरणनिर्मितीसाठी वर्तमानपत्र, मासिके, रेडिओ, टी.व्ही. याद्वारे विज्ञानविषयक माहिती देणारे कार्यक्रम राबविले पाहिजेत असे त्यांना वाटते. वैज्ञानिक जागृती करणे, विज्ञान-साहित्याचा प्रसार

करणे, विज्ञानाविषयी लोकांच्या मनात आवड निर्माण करणे ही बाळ फोंडके यांच्या लेखनामागील भूमिका आहे.

त्याचप्रमाणे बाळ फोंडके विज्ञानावर आधारित व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे यामध्ये भाग घेतात व त्यातून विज्ञानाचा प्रसार करतात. लोकांमध्ये वैज्ञानिक शोधाविषयी, प्रगतीविषयी जनजागृती केली पाहिजे असे त्यांना वाटते.

तात्पर्य, बाळ फोंडके यांना वाचनाची, लेखनाची आवड असल्याने त्यांनी वेगवेगळ्या विज्ञानसूत्रांचा वापर करून विज्ञानकथा लिहलेल्या दिसतात. बाळ फोंडके यांना सततच्या वाचनातून अभ्यासातून चिंतनातून प्रेरणा मिळत गेली व त्यांनी विविध विज्ञान विषय आपल्या कथेत हाताळले. त्यांनी इतरही साहित्यप्रकार हाताळले पण त्यांना विज्ञानकथालेखनाची आवड असल्याने त्यांनी विज्ञानकथालेखनच केलेले दिसते. लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे, विज्ञान साहित्याचा प्रसार व प्रचार करणे, विज्ञानातील नवीन शोधांची माहिती लोकांना देणे, विज्ञानसाहित्याविषयी आवड निर्माण करणे, ही त्यांच्या कथालेखनामागील भूमिका दिसते.

## ३. डॉ.बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथेचे विशेष :-

डॉ.बाळ फोंडके हे उत्कृष्ठ विज्ञानकथाकार आहेत. त्यांच्या अनेक विज्ञानकथांना व विज्ञानकथासंग्रहाना भारत सरकार, महाराष्ट्र सरकार, साहित्य परिषद व इतर संस्थाकडून पुरस्कार मिळालेले आहेत. एकाच वेळेस प्रयोग शाळेत आणि साहित्यसृष्टीत, विज्ञानसुत्रात आणि वाङ्‌मयात त्यांनी सहजपणे संचार केलेला दिसतो. बाळ फोंडके यांना कथालेखनाची विलक्षण कला अवगत झालेली आहे. त्यांच्याकडे वाङ्‌मयीन सर्जनशीलता दिसून येते. तसेच कथेची मांडणी, निवेदन पद्धती, विज्ञानसूत्र, भाषाशैली, गुढता, रहस्यमयता, कलात्मकता ही त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये दिसून येतात.

डॉ.बाळ फोंडके आपल्या विज्ञानकथेची सुरूवात आकर्षक, जिज्ञासावर्धक अशी करतात. दैनंदिन जीवनातील एखादया साध्या प्रसंगातून कथेला प्रारंभ होतो. त्यामुळे कथेला स्वाभाविकतेची पार्श्वभूमी लाभते. त्यांच्या कथेत पाल्हाळ नसते. प्रसंग, संवाद व वर्णनाचा नेमकेपणा असतो. विषयाची कलात्मक मांडणी असते. उत्सुकता वाढविणारे कथानक, वातावरणनिर्मिती करणारी मोजकी पात्रे आणि व्यक्तिवैशिष्ट्याचे स्वभावगुणाचे बारकावे त्यांनी अचूक टिपलेले दिसतात. त्यामुळे त्या कथेला वास्तवदर्शीपणा येतो व ती अधिकच परिणामकारक ठरते.

तृतीय पुरूष निवेदन पद्धतीने ते आपली कथा सादर करतात. घटना प्रसंगाला अनुसरून एखादे सुभाषितवजा वाक्य टाकण्याची त्यांची पद्धत आहे. पल्लेदार वाक्याऐवजी ते साधी, सरळ छोटी छोटी वाक्ये वापरतात. त्यांच्या वैज्ञानिक संज्ञा सोप्या भाषेत असतात. त्यांच्या लेखनशैलीत प्रवाहीपणा आहे. या ओघवत्या शैलीमुळे त्याची विज्ञानकथा सहजपणे उलगडत जाते. एखादया वैज्ञानिक विषयावर आधारलेली कथा क्लिष्ट न वाटता वाचनीय करण्यास त्यांची भाषा आणि कथाशैलीच कारण ठरते.

- **कथा आणि विज्ञानाचा प्रमाणबध्द वापर :-**

साहस, रहस्य, गूढ, कुतुहल, उकल, माफक विज्ञान यांचा प्रमाणबद्ध मिलाफ त्यांच्या कथेत येतो. त्यांच्या कथेतील घटना कधी अद्भूत, चमत्कृतिजन्य तर कधी गूढ, कुतुहलजन्य वाटतात. त्यामागे एक वैज्ञानिक, बौद्धिक सत्य लपलेले असते. त्याची उकल ते कलात्मक, कथात्मक रीतीने करतात. तेव्हा ते प्रत्ययकारी वातावरणनिर्मितीही करतात. त्यामुळे इच्छित परिणामकारकता त्यांना साधता येते. त्यांची विज्ञानकथा, गूढकथा, रहस्यकथा, भयकथा अशा प्रभावाने पुढे सरकते. एखादे कोडे उलगडत जावे याप्रमाणे त्यांच्या कथेतील विज्ञान व शास्त्रीय माहिती सुस्पष्ट होत जाते. रंजन आणि विज्ञानाची माहिती एकाच वेळी कथेतून मिळण्याचा आनंद वाचकास होतो.

- **विज्ञानतंत्राचा वापर :-**

बाळ फोंडके आपल्या कथेत विविध विज्ञानतंत्राचा वापर करतात. त्यांची कथा पूर्णपणे नागर असून त्यात शहरी वातावरण असते. विज्ञान व माणूस यांच्या अतूट अनुबंधाचे चित्रण त्यांच्या कथेत येते. कथानकात घटना प्रसंगाची साखळी कशी गुंफावी, संवाद, सुभाषित कशी यावीत याचे तंत्र त्यांना चांगलेच अवगत झाल्याचे दिसते.

- **भाषाशैलीतील स्वाभाविकता :-**

भाषिक दृष्ट्या या लेखकाने स्वाभाविकता स्वीकारलेली आहे. त्यांच्या शैलीत विनोदाची छटा आहे. सुभाषितांची शीघ्रता आहे. प्रसंग चित्रणात चित्रमयी शैलीची हुबेहुबता आहे. बोली भाषेच्या वापराने कथा वास्तविक अनुभव देण्यास समर्थ ठरते. विज्ञानकथेत इंग्रजी शब्द, शब्दप्रयोग क्वचित इंग्रजी संवाद यांचा वापर अनेकदा झालेला दिसून येतो. मराठी म्हणी, सुभाषिते, वाक्यप्रचार यांचाही वापर दिसतो. त्यामुळे या कथेला श्रेष्ठ दर्जाची वाङ्मयीन गुणवत्ता प्राप्त होते.

● **कथेचा शेवट :-**

बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथेचा शेवट अनपेक्षित प्रसंगाने किंवा नाट्यपूर्ण कलाटणीने होतो. धक्कादायक किंवा नाट्यात्मक अशा अखेरीमुळे त्यांची विज्ञानकथा परिणामकतेच्या दृष्टीने यशस्वी ठरते.

● **वाङ्मयीन गुणात्मकता व विज्ञानाची सुस्पष्टता :-**

या विज्ञानकथाकाराने फार मोठ्या प्रमाणावर कथा लिहिल्या नाहीत पण त्यांच्या विज्ञानकथेची वाङ्मयीन गुणात्मकता आणि विज्ञानाची सुस्पष्टता वाचकाला बौद्धिक आनंद देते. विज्ञानाचे विविध पैलू उलगडून दाखविण्याचे ज्ञानवर्धक काम त्यांची कथा मनोरंजकतेने करते.

● **कथात्म गुंफणीचे कौशल्य :-**

वैज्ञानिक संकल्पनांचा आधार घेऊन त्याभोवती कल्पित कथात्म गुंफन कौशल्याने उभी करण्यात त्यांची भाषाशैली, संवादचातुर्य, विनोदबुद्धी, भाषिक कौशल्य, निरीक्षणशक्ती, मानवी स्वभावाची पारख, सादरीकरणाचे कौशल्य इ. वैशिष्ट्ये आधारभूत ठरतात. विज्ञानातील वास्तवाबरोबर विज्ञानाचे भाकित, कल्पित संभाव्यता यांचाही आधार घेऊन यांत्रिक, तांत्रिक, वैज्ञानिक प्रगतीच्या अनुरोधाने त्यांची कथा बहरलेली आहे. हेच त्यांच्या विज्ञानकथेचे खरे यश आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विशेषत: बायोटेक्नॉलॉजी आणि इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी या क्षेत्रात होणाऱ्या क्रांतीमुळे एकविसाव्या शतकातील मानवी जीवनावर फार मोठा परिणाम होत आहे. याचे चित्रण त्यांच्या कथेतून दिसते. तसेच जागतिकीकरणाची प्रक्रिया आणि बाजारपेठेचा विस्तार यामुळे जी जीवघेणी स्पर्धा रूढ होत आहे, याचे विदारक दर्शन त्यांच्या कथामधून दिसते.

तात्पर्य, वैज्ञानिक, संशोधक, पत्रकार, श्रेष्ठ विज्ञानकथालेखक बाळ फोंडके यांच्या लेखनात बहुश्रुतता, तत्परता, तात्कालिकता हे विशेष दिसून येतात. त्याचप्रमाणे कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय मांडण्याचे कौशल्य त्यांच्या भाषाशैलीत आहे. विज्ञान तंत्रज्ञानाला अर्थकारणाचे आणि राजकारणाचे शासकीय धोरणाचे आणि संस्थांतर्गत चाललेल्या साठमारीचे असलेले परिमाण बाळ फोंडके अचूकपणे हेरताना दिसतात.

तसेच कथेची सुरूवात व शेवट ते अतिशय सहजपणे करतात. त्यांच्या बहुतेक कथा रहस्यमय गूढ असतात. त्यामुळे वाचकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्या कथेत आहे.

ओघवती शैली, कला अणि विज्ञानाचा प्रमाणबद्ध वापर, भाषाशैलीतील स्वाभाविकता, वाङ्मयीन गुणात्मकता व विज्ञानाची सुस्पष्टता, कथेची सुरेख मांडणी या विशेषामुळे त्यांच्या कथा प्रभावी ठरतात.

## ४. बाळ फोंडके यांच्या विज्ञान कथा :-

बाळ फोंडके यांनी विविध विज्ञान विषयावर, वेगवेगळ्या विज्ञानसूत्रावर, विज्ञान तंत्रज्ञानावर आधारित विज्ञानकथा लिहल्या आहेत. त्यांच्या विज्ञानकथा गूढ, रहस्यमय, मनोरंजक, वाचनीय असल्यामुळे त्या लोकप्रिय झाल्या व त्यांना विविध पुरस्कार मिळाल्याचे दिसते.

बाळ फोंडके हे उत्कृष्ट विज्ञानकथाकार आहेत त्यांचे 'युरेका' (१९८५), 'अमानुष' (१९८५), 'चिरंजीव' (१९८६), 'गुडबाय अर्थ'(१९८९), 'गोलमाल' (१९९३), 'अखेरचा प्रयोग' (१९९४), 'खिडकीलाही डोळे असतात' (१९९९), 'व्हर्च्युअल रिॲलिटी' (२००१), 'विज्ञानप्रपंच' (२००५) हे उल्लेखनीय विज्ञानकथासंग्रह आहेत. त्यांच्या 'चिरंजीव' या पुस्तकास राज्य सरकारचा पुरस्कार मिळालेला आहे.

''अस्सल विज्ञानकथा आणि विज्ञानकथेचा आभास निर्माण करणारे लेखन हयात फरक केला पाहिजे. उदा.एखादया वैज्ञानिक सिद्धांताचे ललित साहित्याच्या अंगाने विवेचन करण्याचा अथवा एखादा शोध कसा लावण्यात आला. यासंबंधी ऐतिहासिक माहिती कथा, कादंबरी वा नाटकाच्या माध्यमातून सांगण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्या लेखकाची ती साहित्यकृती विज्ञानकथेत समाविष्ट करता येणार नाही.''[३] असे डॉ.बाळ फोंडके यांना वाटते.

डॉ.बाळ फोंडके यांची विज्ञानकथा ही विज्ञान आणि मानवी जीवन यांच्या सुयोग्य संबंधाची अपेक्षा करते आणि वर्तमान वास्तवात निर्माण होणाऱ्या विज्ञानजन्य समस्यांची उत्तरे शोधते. बाळ फोंडके यांच्या मते, ''विज्ञानकथेत कथा हा मुख्य पदार्थ असून त्यातील विज्ञान हे मिठासारखे असावे. मीठ नसेल तर पदार्थ अळणी होऊन बिघडून जाईल. उलटपक्षी मिठाचा अतिरेक झाल्यांसही तो खारट पदार्थ तोंडात घेऊ वाटणार नाही. म्हणून ते योग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे.''[४]

विज्ञानकथेच्या बाबतीत काही कसोट्या लागू पडतात. त्यांतील प्रस्थापित विज्ञानाचे सूत्र जसेच्या तसे अबाधित स्वरूपातच वापरले जाणे आवश्यक आहे. त्यात बदल करण्याचे स्वातंत्र्य लेखकाला नाही. उदा. गुरूत्वाकर्षणाच्या नियमानुसार या पृथ्वीवरील पदार्थ जमिनीकडे खेचला

जाणार असेल तर केवळ कथेच्या सोयीसाठी तो नियम डावलता येत नाही. असे डॉ.बाळ फोंडके यांचे म्हणणे आहे.

बाळ फोंडके विज्ञानकथेविषयी सांगतात की, विज्ञानकथा ही प्रथम चांगली कथा हवी. पण केवळ चांगली असून त्यातील विज्ञान चुकीचे असेल किंवा अगदीच थातुरमातुर असेल तर ती कथा विज्ञानकथा मानता येणार नाही. याचा अर्थ असा की, विज्ञानकथेतील विज्ञान अतिशय तपशीलवार, विज्ञान क्षेत्रात नेहमी वापरल्या जाणाऱ्या रूक्ष बोजड भाषेत नसावे तर ते विज्ञान कथेच्या ओघात सहज आलेले आणि त्या जागी चपखल बसेल असे असणे आवश्यक आहे.

बाळ फोंडके हे विज्ञानकथांमधील विज्ञानाचे दोन प्रकार सांगतात. पहिल्या प्रकारातील विज्ञान कठोर असते. मुळाशी जास्त प्रामाणिक असते. इंग्रजीत याला 'हार्ड केअर' असे संबोधले जाते. दुसऱ्या प्रकारातील विज्ञान संभाव्य असले तरी अजून प्रत्यक्षात उतरलेले नसते. याला 'सॉफ्ट केअर' असे म्हणतात.

बाळ फोंडके यांना जयंत नारळीकरांच्या कथेत विज्ञानाचा अतिरेक आढळतो. याचा अर्थ नारळीकरांच्या साऱ्याच कथा दोषाने डागाळलेल्या नाहीत. तर 'उजव्या सोंडेचा गणपती', 'गंगाधर पंताचे पानिपत', 'पुत्रवती भव' यासारख्या कसोट्यांना उतरणाऱ्या चांगल्या कथाही त्यांनी लिहिल्या आहेत. अशाच कथांची त्यांच्याकडून सर्वांना अपेक्षा आहे असे त्यांना वाटते. अळणी विज्ञानकथांची, अगदीच तुटपुंजे अशक्त विज्ञान असलेल्या कथांची कमतरता नाही असे त्यांना वाटते. लक्ष्मण लोंढ्यांच्या कथा अशा प्रकारच्या आढळतात. त्या कथा म्हणून उत्तम आहेत पण त्याला विज्ञानाचे तोकडे अस्तर लावल्यासारखे वाटते.

बाळ फोंडके यांनी निरंजन घाटे यांच्याविषयी म्हटले आहे की, ''निरंजन घाटे हे सध्याचे आघाडीचे विज्ञानकथाकार स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव न झालेले व पालवलेल्या अपेक्षा पुऱ्या न करणारे कथाकार असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. ते सदैव घाईत असल्यासारखे लिहितात. कादंबरीचा आवाका मागणारी संकल्पना कथेमध्ये आणि कथेची व्याप्ती असणारा विषय एखादया चुटक्यात संपवावा तशा त्यांच्या कथा वाटतात. त्यात विज्ञान असते, कथाही असते पण दोन्ही कावळ्यांनी आंघोळ केल्यासारख्या घाईगर्दीने ओरबाडून काढल्यासारख्या वाटतात. त्यांची कथा चटका लावत नाही. चुटपुट लावते.''[५]

भालबा केळकर आणि गो.बा.सरदेसाई यांच्या कथांमध्ये पौराणिक कथांना एक वेगळा संदर्भ देण्याचा, तसेच प्रचलित विज्ञानसूत्राद्वारे त्याचा नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न दिसतो. अशा तऱ्हेने बाळ फोंडके यांनी विविध विज्ञानलेखकांविषयी आपली परखड मते मांडलेली दिसतात. विज्ञान कादंबरी विषयी ते लिहतात की, मराठीत दर्जेदार विज्ञान कादंबऱ्यांची कमतरता आहे. तेव्हा कादंबऱ्यांमधून नसली तरी लघुकथेमधून मराठी विज्ञानकथा निश्चित आकार घेत आहे असे त्यांना वाटते.

डॉ.बाळ फोंडके यांनी विज्ञानकथेच्या आजवरच्या वाटचालीचे चार टप्पे दर्शविले आहेत ते असे, पहिल्या टप्प्यातील विज्ञानकथा ही साहसावर भर देणारी आणि अनेकदा परिकथेचे रूप धारण करणारी. मेरी शेलीची 'फ्रॅंकेनस्टाईन' ही कथा हया टप्प्यातली, तिच्यात साहसाचा अंत:प्रवाह स्पष्ट दिसतो. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या, चौथ्या दशकापर्यंत साहसाधिष्ठित विज्ञानकथा लिहिल्या जात होत्या.

दुसऱ्या टप्प्यावरील विज्ञानकथेवर गर्नझ्बॅक, कॅम्पबेल यांच्या विज्ञानकथाविषयीच्या धारणाचा प्रभाव होता. प्रस्थापित विज्ञान आणि काल्पनिकता हयांचा तोल साधण्यासाठी विज्ञानकथाकारांना हया काळात तारेवरची कसरत करावी लागत असे.

विज्ञानकथेचा तिसरा टप्पा दुसऱ्या महायुद्धानंतरचा, हया टप्प्यावरील विज्ञानकथा प्रस्थापित विज्ञानाशी नाते सांभाळून असली तरी ती भविष्याचा वेध घेताना सामाजिक प्रश्नांबद्दल विशेष आस्था बाळगू लागली. वैज्ञानिक, तांत्रिक विकासाचे एकंदर मानवी समाजावर होणारे परिणाम ती चित्रित करू लागली. चौथ्या टप्प्यातली विज्ञानकथा, आशयापेक्षा घाट आणि शैली हयांना अधिक महत्त्व देऊ लागली. असे बाळ फोंडके यांचे मत आहे.

- **डॉ.बाळ फोंडके यांच्या विज्ञान कथेचे स्वरूप :-**

बाळ फोंडके यांच्या विज्ञान कथेचे स्वरूप हे नाविन्यपूर्ण असे आहे. त्यांच्या कथेत घटना , प्रसंग, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती, भाषाशैली, संवाद, कथासूत्र यांची चांगली गुंफण केलेली दिसते. त्यांनी वेगवेगळ्या विज्ञानतंत्राचा व विज्ञान शोधांचा वापर करून वैशिष्टपूर्ण अशा विज्ञानकथा लिहिलेल्या दिसतात. विज्ञानाचे विविध पैलू उलगडून दाखविण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. त्यांच्या बहुतेक कथांचे स्वरूप अदभूत, गूढ, रहस्यमय असे दिसून येते.

''विज्ञानकथा ही एक ललित साहित्यकृतीच असते. त्यामुळे तिला विज्ञानाचे अधिष्ठान असलेच पाहिजे. हे मान्य केल्यानंतर, तिचे मूल्यमापन करताना कथा, कादंबरी, नाटक यासारख्या साहित्यकृतींच्या मूल्यमापनासाठी समीक्षेचे जे निकष वापरले जातात तेच येथेही लावले पाहिजेत. तसेच विज्ञानाचे आवश्यक अधिष्ठान दुबळे, अपूरे असल्यामुळे एखादी साहित्यकृती विज्ञानकथा म्हणून दर्जेदार ठरणार नाही. पण एक साहित्यकृती म्हणून श्रेष्ठ ठरेल.त्याच्या उलटही घडू शकेल. एखाद्या साहित्यकृतीतील विज्ञानाचा घटक अस्सल असूनही एक साहित्यकृती म्हणून ती कनिष्ठ दर्जाची ठरू शकेल. ''[६] असे त्यांना वाटते.

बाळ फोंडके नजीकच्या भविष्यकाळात शक्य असलेल्या विज्ञानशोधांच्या आधार घेतात पण त्याविषयी तपशीलाने लिहित नाहीत. संशोधनाची पळवापळवी, त्यांचे पेटंट मिळविणे, कॉन्ट्रॅक्ट मिळवणे यासाठी चालणाऱ्या औदयोगिक क्षेत्रातील चढाओढी प्रसंगी क्रौर्याच्या अमानुष पातळीवर कशा जातात, त्याचप्रमाणे विज्ञानातील शोधाचा वैज्ञानिकांच्या आयुष्यावर, विज्ञान व्यवहारावर कोणता व कसा परिणाम होतो याचे चित्रण त्यांच्या कथांतून होते. त्यांच्या काही कथा दीर्घ असतात. त्याचे निवेदन पुरेसे प्रभावी नसते. ते संथ गतीचे असते. त्याचप्रमाणे इंग्रजी शब्दांचा अधिकाधिक वापर दिसतो.

● **खिडकीलाही डोळे असतात :-**

'खिडकीलाही डोळे असतात' हा बाळ फोंडके यांचा रहस्य 'विज्ञानकथाचा कथासंग्रह ' आहे. या विज्ञानकथासंग्रहात चंद्रगुप्ताची अंगठी, यमघंटा, खिडकीलाही डोळे असतात, दिसत तसं नसतं, चष्मदीद गवाह, रक्ताचा रिपोर्ट, पळपुटा हेर, बिंब प्रतिबिंब, पिण्याला थेंबही नाही अशा वैशिष्ट्यपूर्ण विज्ञानकथा आहेत. यामध्ये कमिशनर अमृतराव मोहिते व डॉ.कौशिक या प्रधान व्यक्तिरेखा असून त्यांचा सर्व कथांमध्ये समावेश आहे. या दोन व्यक्तिरेखा वैज्ञानिक दृष्टिकोन वापरून खुनाचा/केसचा शोध लावतात व कथेला नाट्यपूर्ण कलाटणी देऊन कथा अधिक उत्कंठावर्धक करतात. तसेच प्रत्येक कथेतील विज्ञान हे विलक्षण आहे. उदा. फिंगरप्रिंन्ट, मास स्पेक्ट्रोग्राफ, सेल्युलर फोन, पेसमेकर, स्लोग्लास खिडकी, लेसर लाईट, होलोग्राम, कॉम्प्युटर किबोर्ड, ऱ्होडोडेन्ट्रॉन झुडुप, पोस्टमार्टम, डी.एन.ए. तपासणी, पोलराईट लाईट, हेवी वॉटर, एलिमेंटरी पार्टिकल्स यासारख्या आधुनिक विज्ञान - तंत्रज्ञानाचा उपयोग केल्याने कथा रहस्यमय व उठावदार झालेल्या दिसतात.

● **व्हर्च्युअल रिॲलिटी :-**

'व्हर्च्युअल रिॲलिटी' हा डॉ. बाळ फोंडके यांचा एक वैशिष्ट्यपूर्ण विज्ञानकथा संग्रह आहे. विज्ञानाच्या घोडदौडीच्या कैफात अस्तित्वात येऊ घातलेल्या बिभत्स वास्तवाची भेदक अनुभूती देणाऱ्या कथा या संग्रहात आहेत. विज्ञानातील नवनव्या शोधाची यंत्र-तंत्र सत्याची सांगड कधी राजकारणाशी, कधी अर्थकारणाशी, कधी व्यापारी स्पर्धेशी घातली जाते. तेव्हा त्याचे काय आणि कसे परिणाम घडतात याचे वस्तुपाठच या कथांतून साकार झाले आहेत.

मानवी अहंकार, जिद्द, मत्सर, लोभ, द्वेष, अशा षडरिपुंच्या आहारी गेल्यानंतर खून, मारामारी, फसवणूक अशा विनाशकारी गोष्टीत परिणती होते. अशा स्त्रीपुरुषांच्या विविध वृत्ती-प्रवृत्तीचे चित्रणही या कथांतून येते.

या संग्रहातील 'गांधारीचे पुत्र' ही कथा अनेक चित्तथरारक शक्यतांचा भविष्यपटच उभा करते. 'पाउंड ऑफ फ्लेश' ही कथा आजच्या 'जिनोम' युगातील प्रश्नाला वेगळ्या जोमाने उभे करते. तर 'वसुली' या कथेत राजकारण सत्तास्पर्धा आणि विज्ञान यांच्यातील सीमारेषा कथा अस्पष्ट होऊ शकतात, याचे अस्वस्थ करणारे चित्रण येते. तसेच या कथासंग्रहातील कथांमध्ये वेगवेगळ्या आधुनिक विज्ञान - तंत्रज्ञानाचा, शोधांचा वापर केलेला दिसतो उदा. क्लोन, टेलोमरेज, डी.एन.ए. फिंगरप्रिन्ट, एड्स रोगावर औषधं अशा वेगवेगळ्या विज्ञानविषयांमुळे बाळ फोंडके यांच्या या विज्ञानकथा वाचनीय ठरतात.

● **विज्ञानप्रपंच :**

'विज्ञानप्रपंच' या विज्ञानकथासंग्रहात एक से दो भले, विज्ञानाची लॉटरी, अति तेथे माती, संगणक सामना, संगणक क्रिकेट, ऑपरेशन विजय, संस्कृतीची उत्क्रांती, कृत्रिम गर्भाशय, विश्वाचं वय, विष आणि अमृत, तुझ आहे तुझपाशी अशा उल्लेखनीय व वाचनीय कथा आहेत. विज्ञानाच्या शोधांमुळे मानवी जीवनाचा चेहरा मोहरा कसा बदलून जातो याचे प्रत्यंतर या कथा देतात. माणसाला आवडो न आवडो विज्ञानाच्या नित्यनूतन आविष्काराच्या प्रभावातून त्याची सुटका नसते. हे एक वैज्ञानिक सत्य काही कथांतून उलगडत जाते.

● **ग्यानबाचं विज्ञान :-**

तल्लख बुद्धीची माणसं आपले कुतुहल दाबू शकत नाहीत. काहीतरी खटपट करतातच, तसा या कथेतील नायक ग्यानबा आहे. आपल्या अवतीभोवतीचा परिसर पाहता पाहता त्याला

अनेक प्रश्न पडतात. ते वाचकाला आकर्षित करतात व त्याचवेळी संभ्रमात टाकतात. कुतुहल जागृत करतात आणि वाचकांचा त्या प्रश्नामागे पाठलाग सुरू होतो. ग्यानबाला वेडपट म्हटले जाते. त्याचे प्रश्न विचित्र असतात. पण त्यामागे काही तर्कसंगती असेल हे दादासाहेब पंडित ओळखून असतात. म्हणून त्यांची ते उत्तरेही देतात. यात विज्ञानप्रश्नोत्तरांची सुरेख मांडणी लेखकाने केली आहे व करमणुकीतून विज्ञानाचे धडे दिलेले आहेत. असे 'ग्यानबाचं विज्ञान' हे बाळ फोंडके यांचे अलिकडच्या काळातील सुरेख पुस्तक आहे.

● **उदया काय झालं :-**

या विज्ञानकथा संग्रहाचे संपादन डॉ. फोंडके यांनी केले आहे. यात लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, निरंजन सिन्हा, डॉ. फोंडके, मुकुल शर्मा, अरविंद मिश्रा, शुभदा गोगटे, सुबोध जावडेकर, आर.एन.शर्मा, अरूण मांडे, संजय हावनूर, अनीश देव, केनेथ डॉरल, देवेंद्र मेवारी यांसारख्या मान्यवर विज्ञानकथा लेखकांच्या कथा समाविष्ट आहेत. याशिवाय त्यांच्या चिरंजीव, गोलमाल, युरेका, गुडबाय अर्थ, अखेरचा प्रयोग इ. विज्ञानकथा संग्रहातील कथाही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

वैज्ञानिक असले तरी बाळ फोंडके यांनी विज्ञान क्षेत्राबरोबरच समाजसंपर्क, साहित्यसंपर्क जोडलेला असून त्या क्षेत्रातही ते कार्यरत आहेत. त्यामुळे पत्रकार, वैज्ञानिक, साहित्यिक, संपादक, संशोधक म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू झाले आहे.

तात्पर्य, बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथा संख्यात्मक दृष्टया फार नसल्या तरी गुणात्मकदृष्टया चांगल्या प्रतीच्या आहेत. त्यांच्या बऱ्याच कथा वैशिष्ट्यपूर्ण आणि त्यांचा लेखक म्हणून वेगवेगळे पैलू दाखविणाऱ्या आहेत. तसेच त्यांचे लेखन हे वैज्ञानिक संकल्पनांचा आधार घेऊन केलेले आहे. त्यांचा विज्ञानाकडे, माणसाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वतंत्र आहे. त्यांच्या विशाल निरीक्षण शक्तीचा प्रत्यय त्यांच्या अनेक विज्ञानकथा मधून दिसतो. भविष्यकाळातील होणाऱ्या यांत्रिक, तांत्रिक, वैज्ञानिक प्रगतीवर आधारित कथा त्यांनी लिहिल्या आहेत.

बाळ फोंडके यांच्या 'खिडकीलाही डोळे असतात' व 'व्हर्च्युअल रिॲलिटी' या दोन विज्ञानकथा संग्रहांचा चिकित्सक अभ्यास या प्रबंधात केलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांची विज्ञानप्रपंच, ग्यानबाचे विज्ञान, उदया काय झालं, विज्ञान नवलाई, दृष्टिभ्रम, ही पुस्तकेही वाचनीय असून विज्ञान क्षेत्राविषयी माहिती देणारी आहेत. प्रस्तुत प्रकरणात बाळ फोंडके यांचे चरित्र, त्यांच्या

विज्ञानकथा, त्यांच्या विज्ञानकथांचे विशेष तसेच बाळ फोंडके यांच्या लेखनामागील प्रेरणा व भूमिका यांच्याविषयी विवेचन केलेले आहे.

पुढील प्रकरणात 'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञान कथासंग्रहाची चिकित्सा करण्यात येईल.

● **निष्कर्ष :-**

१) डॉ.बाळ फोंडके यांच्या लेखनात बहुश्रुतता, तत्परता, तात्कालिकता हे गुण दिसून येतात.

२) त्यांच्या कथाचे अनुवाद जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, इटालियन, हिंदी , बंगाली, ओरिसा, कन्नड अशा विविध भाषांमध्ये झालेले आहेत.

३) विज्ञान विषयांची कलात्मक मांडणी, उत्सुकता वाढविणारे कथानक, रहस्यमय, गूढ वातावरणनिर्मिती, मोजकी पात्रे, संवाद, वास्तवदर्शीपणा ही त्यांच्या विज्ञान कथेची वैशिष्ट्ये दिसतात.

४) कला आणि विज्ञानाचा प्रमाणबद्ध वापर केलेला दिसतो. तसेच आधुनिक विज्ञानतंत्राचाही कौशल्याने वापर केल्याचे दिसते.

५) डॉ.बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथा या केवळ मनोरंजनात्मक परीकथा नसून भीषण आणि विद्रूप वास्तवाचे भेदक चित्रण करणाऱ्या कथा आहेत.

६) बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथा संख्यात्मकदृष्ट्या फार नसल्या तरी गुणात्मकदृष्ट्या चांगल्या प्रतीच्या आहेत.

७) भविष्यकाळातील होणाऱ्या यांत्रिक, तांत्रिक, वैज्ञानिक प्रगतीवर आधारित कथा त्यांनी लिहलेल्या आहेत.

८) बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथांमध्ये वैविध्यपूर्णता दिसून येते.

९) बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथा आशयाने समृद्ध व विषयाने अर्थपूर्ण आणि शैलीने भारदस्त आहेत.

१०) बाळ फोंडके वाचकांना विचारप्रवृत्त करतात आणि वाचकांना चिंतनशील बनवतात.

११) बाळ फोंडके यांची प्रगाढ कल्पनाशक्ती, मानवी जीवनाचे आकलन, सूक्ष्मदृष्टी, डोळस भूमिका, चिंतनशील वृत्ती दिसून येते.

## • संदर्भ ग्रंथ सूची •


१) बाळ फोंडके : ' व्हर्च्युअल रिॲलिटी ' प्रकाशन-मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे. आवृत्ती प्रथमावृत्ती ऑगस्ट २००१, पृष्ठ क्र. ७

२) सु.प्र.कुलकर्णी : ' महाराष्ट्र साहित्य पत्रिका', प्रकाशन-महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, विज्ञान कथा विशेषांक, आवृत्ती ऑक्टो. २००६ ते डिसेंबर २००६ (त्रैमासिक) पृष्ठ क्र. १४

३) मराठी विश्वकोष : खंड - १६, 'वादयवृंद ते विज्ञान शिक्षण' प्रकाशन -महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, पृष्ठ क्र. ९९१


४) डॉ.व.दि.कुलकर्णी : ' विज्ञान साहित्य आणि संकल्पना' प्रकाशन-नीहारा प्रकाशन आवृत्ती - प्रथमावृत्ती, ऑक्टोबर १९९० पृ.क्र.१०४

५) तत्रैव : पृष्ठ क्र. १०७

६) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : मराठी विश्वकोष खंड १६ 'वाद्यवृंद ते विज्ञान शिक्षण' प्रकाशक-महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई, पृ.क्र. ९९१

प्रकरण ४ थे

# 'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञान कथासंग्रहाची चिकित्सा


खिडकीलाही डोळे असतात
डॉ. बाळ फोंडके

## प्रकरण ४ थे

# ‘खिडकीलाही डोळे असतात’ या विज्ञानकथा संग्रहाची चिकित्सा

## १. ‘खिडकीलाही डोळे असतात’ या विज्ञानकथा संग्रहाची रचनाशैली :-

‘खिडकीलाही डोळे असतात’ हा बाळ फोंडके यांचा रहस्यमय विज्ञानकथांचा संग्रह असून त्यांची वैशिष्टयपूर्ण अशी रचनाशैली आहे. यामधील विज्ञानकथा वेगवेगळे विज्ञानसूत्र वापरून लिहलेल्या आहेत. यातील पात्रे, घटना, प्रसंग, वातावरणनिर्मिती, संवाद यांचा सुरेख वापर लेखकाने केला आहे व लालित्यपूर्ण भाषेचा वापर करून कथा गुंफलेल्या आहेत. कथेची सुरूवात आकर्षक असून शेवटही गूढ, रहस्याचा उलगडा करणारा असा आहे. या संग्रहातील सर्वच कथा वाचनीय आहेत. तसेच मनोरंजक व उद्‌बोधकही आहेत.

यातील पोलीस कमिशनर अमृतराव व सायंटिस्ट डॉ.कौशिक या दोन प्रमुख व्यक्तिरेखा सर्व कथांमध्ये सहजतेने वावरताना दिसतात. तसेच या व्यक्तिरेखा खुन्याचा शोध लावतात. या कथांची रचनाशैली ही रहस्यमय आहे. कथेच्या शेवटी निवेदनाच्या माध्यमातून गूढ/रहस्य बाहेर पडते. वाचकाला गुंतवून ठेवण्याचे काम लेखक करतो व एक वेगळा अनुभव वाचकाला देतो. त्यांची जिज्ञासा जागृत करतो. लेखकाची भाषाशैली, संवादचातुर्य अप्रतिम आहे. त्यांच्या रचनाशैलीचे वैशिष्टये म्हणजे प्रत्येक कथा ही स्वतंत्र वेगळ्या पद्‌धतीने मांडली आहे. या कथांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

### १. चंद्रगुप्ताची अंगठी :-

मुख्यमंत्री माधव सबनीस अमृतरावांचे वर्गमित्र, दोघांची जुनी ओळख. पण दोघांची कार्यक्षेत्र वेगवेगळी होती. अमृतराव हे पोलीस कमिशनर तर माधव सबनीस मुख्यमंत्री व रावबाजी हे माजी मंत्री व आता विरूद्‌ध पक्ष नेते होते. मंत्री असताना त्यांच्याकडे पोलीसखाते होते. त्यांचा स्वभाव हरहुन्नरी व पारदर्शी होता. चोरीला गेलेली चंद्रगुप्ताची अंगठी आपण परत मिळविली आहे असा ते दावा करतात.

सत्ताधारी गट आणि विरोधी गट यांच्यामध्ये लोकशाहीत निमित्त मिळाले की, संघर्ष पेटतोच. मुख्यमंत्री सबनिसांना विरोधी पक्षनेते रावबाजी यांचे चंद्रगुप्ताच्या अंगठीचे आव्हान झोप

उडविणारे ठरते. म्युझियममधील अंगठीच खरी आहे, हे सिद्‌ध करण्यासाठी मुख्यमंत्री सबनीस मित्रत्वाच्या नात्याने अमृतरावांना गुप्ततेने काम करण्यास सांगतात.

अंगठीचा खरेखोटेपणा ठरविण्यासाठी अंगठीचे रेडिओकार्बन करणे, मास स्पेक्ट्रोग्राफ यंत्राचा वापर करणे, फिंगरप्रिन्ट पडताळून निदान करणे, अशा वैज्ञनिक पद्‌धतीने जावे लागते. अर्थात यासाठी डॉ.कौशिक, कमिशनर अमृतराव ही मंडळी असतात. शिवाय सहाय्याला डॉ.पारेख हे म्युझियमचे व्यासंगी क्युरेटर असतात. शेवटी ती अंगठी चंद्रगुप्ताचीच आहे हे सिद्‌ध होते. पुरातत्व विज्ञानातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती या कथेत उलगडत जाते.

'या इंटनेटनं मोठी सोय केलीय अमृतराव. जगात कुठंही एखादी माहिती उपलब्ध असेल, तर ती आपण घरबसल्या मिळवू शकतो. निरनिराळ्या काळातल्या जगाच्या पाठीवरच्या कोणत्याही खनिजांची इत्यंभूत माहिती असलेला डेटाबेस अमेरिकेन स्मिथसोनियन संस्थेकडे आहे. तिथूनच आता मी अलेक्झांडरच्या काळातील ग्रीसमधल्या सोन्याच्या खाणींमधल्या खनिजांची माहिती मागवली आहे. हा आपल्याकडचा फिंगरप्रिन्ट त्याच्याशी पडताळून पाहिला की या अंगठीच्या खरेखोटेपणाची शहानिशा होईल.' (पृष्ठ क्र.१५ ''चंद्रगुताची अंगठी'')

अशारीतीने डॉ.कौशिक अतिशय सहजपणे ओघवत्या भाषेत इंटरनेट कॉम्प्युटरची माहिती देवून वैज्ञानिक प्रगतीचा आढावा देतात. वरील विज्ञानकथेतील वैज्ञानिक रहस्य, शोधून काढण्यासाठी जो वैज्ञानिक मार्ग आहे तोच वाचकांची जिज्ञासा सतत वाढवत नेणारा आहे.

**२. यमघंटा :-**

हिरालाल शेटजी हे अमृतराव व कौशिक यांचे निकटचे मित्र होते. त्यांच्याबद्‌दल या दोघांनाच काय पण समाजातल्या अनेकांना आदर होता. परिस्थितीपायी हातून अपराध घडून तुरूंगात जाण्याची पाळी आलेल्या अनेकांचे पुर्नवसन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. तेव्हाच त्यांचा अमृतरावांशी संबंध आला अन्‌ हे संबंध मैत्रीत बदलले व कौशिकांची व शेटजींची मनं कशी जुळली, हे दोघांनाही नसतं सांगता आले.

हिरालाल शेटजींसारख्या देवमाणसाच्या मृत्यू झाला होता. मृत्यू हार्टअॅटक ने झाल्याचे दिसत असले तरी शेटजींचा मुलगा नरेंद्र हा मृत्यू नैसर्गिक झाला हे मानण्यास तयार नव्हता. त्याच्या म्हणण्यावरून कौशिक व अमृतराव खरे काय, याचा शोध लावतात.

'या हार्ट पेशंटची हीच तर मुळी खास गोष्ट असते. कोणत्या क्षणी काय होईल हे काही सांगता येत नाही. बोलता बोलता माना टाकल्याची किंवा चालता चालता जागच्या जागी कोसळून पडल्याची कमी का उदाहरण आहेत !' (पृष्ठ क्र.१९ ''यमघंटा'')

हिरालाल शेटजींच्या मृत्यूनंतर कौशिक अमृतरावांशी बोलताना शेटजीं बद्दल हे उद्गार काढतात. शेटजींचे कुटुंब सुसंस्कृत होते. इलाबेन हया त्यांच्या पत्नी तर साक्षात अन्नपूर्णा होत्या. दोघांचे नरेंद्र या मुलावर चांगले संस्कार होते. पण शेटजी हृदयविकाराने त्रस्त होते. डॉक्टरांनी पेसमेकर बसविल्यापासून त्यांची प्रकृती तशी ठणठणीत होती. इलाबेन ही त्यांची पत्नी गेल्यानंतर त्यांनी पुष्पाबेन बरोबर संसार थाटला होता. पुष्पाबेन इलाबेनच्या मुलांचा दु:स्वासच करत असते व शेटजी संपूर्णपणे तिच्या कह्यात गेले होते. तसेच तिचा मावसभाऊ रणजित ही तिच्या जोडीला होता.

शेटजींचा मुलगा नरेंद्र याला शेटजींचे पोस्टमार्टम व्हावे असे वाटत होते. त्यानंतर कौशिक व अमृतराव घटनेची सर्व माहिती मिळवण्यास सुरूवात करतात. या मिळालेल्या माहितीनुसार शेटजींना हार्टअ‍ॅटक गाडीमध्ये असताना आला होता व त्यांचा ड्रायव्हर वडके यांने त्यांना जवळच्या संजीवन क्लिनिकमध्ये नेले पण तोपर्यंत शेटजींनी या जगाचा निरोप घेतला होता.

नरेंद्रच्या सांगण्यावरून शेटजींनी नवीन मृत्यूपत्र केले होते व त्यांचे सर्व अधिकार, सारी मालमत्ता पुष्पाबेनच्या नावे केली होती. ड्रायव्हर वडकेने दिलेल्या माहितीनुसार व गाडीच्या पाहणीवरून गाडीमध्ये सेलफोन असल्याचे कौशिक व अमृतराव यांच्या निर्दशनास येते. डॉ.भालेरावांनी शेटजींना सेलफोन न वापरण्याचा सल्ला दिला होता. कारण सेलफोनच्या सिग्नलने हृदयाच्या कामात अडथळा येतो. त्यांच्या हृदयास धोका असल्याचे माहित असूनदेखील पुष्पाबेन व रणजितने शेटजींच्या गाडीत सेलफोन लावला होता, यावरून शेटजींचा मृत्यू हा नैसर्गिक नव्हता तर घडवून आणला होता. हे सर्वाच्या निर्दशनास येते.

**३. खिडकीलाही डोळे असतात :-**

'भिंतीलाही कान असतात' या वाक्यप्रचारावरून या रहस्य विज्ञानकथेचे शीर्षक घेऊन लेखकाने वाङ्मयातील भाषिक सौंदर्याचा स्पर्श घेतलेला आहे. या रहस्य विज्ञानकथासंग्रहातील ही शीर्षककथा आहे.

डॉ. सतीश नागपाल श्रीमंत व प्रतिष्ठित असतो. त्याची पत्नी नीता हिचा खून होतो. त्या खूनाच्या तपासचे काम कमिशनर अमृतराव आणि डॉ.कौशिक यांच्याकडे येते. कोणताच पुरावा ठेवला नसल्यामुळे व खुनास कोणीही साक्षीदार नसल्यामुळे तपास कामाला चालना मिळत नाही. तेव्हा हे दोघे जण डॉ. नागपालच्या घरी जातात, 'ही खिडकी स्लोग्लासचीच आहे ना? हिमाचलमधल्या त्या डोंगराळ भागातून घेतलेली ?' (पृष्ठ क्र.४५ खिडकीलाही डोळे असतात) असे खुनाचा तपास करताना डॉ.कौशिक सतिश नागपालला विचारतात. कमिशनरच्या पोलीस नजरेला आणि डॉ. कौशिकांच्या वैज्ञानिक नजरेला त्या घराची स्लोग्लासची खिडकी येते. त्या खिडकीच्या काचेमध्ये खून करते वेळेची हकीकत रेकॉर्ड झालेली असते. त्यामुळे खून कोणी केला व कसा केला हे सारे उघड होते. नीता नागपालचा खून तिचा पती डॉ.सतीश नागपालनेच केल्याचे सिद्ध होते.

स्लोग्लासच्या खिडकीमध्ये वापरलेले वैज्ञानिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक रहस्य वाचकांची जिज्ञासा जागृत करून त्यांना कथेकडे आकर्षित करते. वैज्ञानिक रहस्य आणि मानवी व्यक्तिरेखा यांच्या चित्रणातून ही रहस्य विज्ञानकथा साकार होते. स्वभावदर्शनाइतकेच महत्त्व वैज्ञानिक तंत्रज्ञानाला या कथेत आले आहे.

**४. दिसतं तसं नसतं :-**

वीरेंद्रराजे घाटगेपाटील मातब्बर आसामी असून त्यांचे राजकीय वजन जबरदस्त होते. त्यांची सून सुमित्राराजे ही भाजलेली असते व तिने मृत्यूपूर्व जबानीत आपल्याला वीरेंद्रराजे घाटगेपाटील या आपल्या सासऱ्याने भाजल्याचे सांगितलेले असते. परंतू सासऱ्याविरुद्ध कोणताच पुरावा उपलब्ध नसतो. दुसरे कोणी असते तर त्यांना गजाआड करता आले असते पण वीरेंद्रराजे बाबत असे करणे सोपे नव्हते. भक्कम पुरावा असल्याशिवाय त्यांना अटक करता येणार नव्हती.

अमृतराव व कौशिक हे जेंव्हा खुनाचा तपास करण्यासाठी वीरेंद्रराजे यांच्या घरी जातात तेंव्हा त्यांना सून गेल्याचं दु:ख झाल्याचे दिसत नव्हते. तसेच सुमित्रा भाजली तेव्हा, ती सुरेंद्रच्या घरी व मी माझ्या घरी होतो, असे वीरेंद्रराजे यांचे म्हणणे होते. प्रत्यक्षदर्शी पुराव्यात काहीच धागेदोरे हाती लागत नव्हते. पुढे तपास करताना डॉ.कौशिक त्यांच्या घराचे निरीक्षण करतात, तिथे त्यांच्यासमोर एक खिडकी दिसते. ती खिडकी इतकी स्वच्छ होती की त्यावर एकही ओरखडा नव्हता. याबाबत वीरेंद्रराजे यांना विचारणा केली असता सुमित्राराजे भाजल्यामुळे स्त्रीमुक्ती मोर्चाने दगडफेक केल्याने काच फुटली व त्याठिकाणी नवीन काच बसविल्याचे ते सांगतात. नंतर

डॉ.कौशिक हे बंगल्या सभोवतालच्या बागेकडे जातात तेव्हा तेथे त्यांना एक काचेचा तुकडा सापडतो, तो विशिष्ट प्रकारचा आहे हे डॉ.कौशिक ओळखतात.

वीरेंद्रराजे यांना लेझर फिजिक्समध्ये इंटरेस्ट होता. लेझर लाईटचा उपयोग करून संपूर्ण त्रिमिती, थ्री डायमेन्शनल चित्रकृती बनवणे शक्य होते. आपल्या खिडकीत वीरेंद्रराजेनी होलोग्राम बसविला होता. काम झाल्यावर त्यांनी ती होलोग्राम असलेली खिडकी फोडून दुसरी नवीन बसविली व स्त्रीमुक्ती मोर्चात खिडकी फुटली असे डॉ.कौशिक व अमृतराव यांना सांगितले. परंतु त्यांच्या तीक्ष्ण नजरेतून त्यांना खिडकीचा तुकडा भेटतो. होलोग्रामचं वैशिष्ट्य असतं. त्याचा कोणताही, लहानातला लहान तुकडा घेतलात तरी त्यातही तुम्हाला संपूर्ण थ्री डायमेन्शनल चित्र दिसतं. डॉ. कौशिकांनी ते एन्लार्ज केलं. डॉ. कौशिक म्हणतात -‘ ऐकलत अमृतराव, धिस इज इंटरेस्टिंग. वीरेंद्रराजे अगदी एखाद्या पुतळ्यासारखे तिथं बसले होते. इतर दिवाणखाना काळोखात ठेवून. धिस इज व्हेरी इंटरेस्टिंग’ (पृष्ठ क्र.६५ दिसतं तसं नसतं)

अशाप्रकारे वीरेंद्रराजेनी होलोग्राफिक प्रतिमा तिथं उभी करून आपण खिडकीपलीकडे असल्याचा आभास उत्पन्न केला होता. त्यामुळे तावडे व माणगावकर या साक्षीदारांना त्यादिवशी ते खिडकीत बसलेले दिसले. प्रत्यक्षात ते तिथे नव्हतेच. तसेच कोणताही मोर्चा त्यांच्या घरावर आला नसल्याचे डॉ.कौशिकांनी स्त्रीमुक्ती संघटनेला फोन केल्यावर कळते.

अशा रीतीने मोठ्या हुशारीने वीरेंद्रराजेनी आधुनिक विज्ञानाची मदत घेऊन भक्कम ऑलिबी, जबरदस्त पुरावा उभा केला होता. पण डॉ.कौशिक व अमृतराव यांच्या तीक्ष्ण नजरेतून ते सुटत नाहीत. शेवटी त्यांनीच सुनेचा खुन केला हे सिद्‌ध होते. तात्पर्य,‘दिसत तसं नसंत म्हणून जग फसत’ ही म्हण याठिकाणी लागू होते. त्यामुळे कोणतीही गोष्ट कशी दिसते, यापेक्षा कशी आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे. याचा प्रत्यय येथे येतो.

### ५. लांडगा आला रे आला :-

अमृतराव आतापर्यंत अनेक क्रिटिकल परिस्थितीतून गेले होते. परंतु यावेळीची परिस्थिती खूप गंभीर होती. ‘डिणाळां रुक्षश्रज्ञ’ अशा अक्षराचा एक संदेश इ-मेल मॅसेजद्‌वारे आला होता. पण त्याचा अर्थ लागत नव्हता तसेच त्या मॅसेजचा अर्थ लावण्याइतपत वेळही फार नव्हता. फक्त साडे तीन तास होते. लाईफ अँण्ड डेथ सिच्युएशन होती. अशावेळी त्यांच्या मदतीला डॉ. कौशिक हे होते आणि ते दोघेही चिंतित झाले होते.

लोकवार्तामधील एक वृत्तसंपादक दुसऱ्या दिवशीच्या अंकाची पानं तयार करण्यात गुंतला असताना त्याला एक निनावी चिठ्ठी मिळते. त्यामध्ये हॉटेल धनंजयमध्ये पंचेचाळीस नंबरच्या खोलीत बॉम्ब असल्याचे लिहिलेले होते. त्या वृत्तसंपादकाच्या सांगण्यानुसार बॉम्ब डिस्पोजल स्क्वॉड, सी.आय.डी. फिंगरप्रिन्टिन्स एक्सपर्टस तेथे पोहचले गेले. पण फॉर्च्युनेट्ली ती खोली रिकामीच होती, असे दोन तीन वेळा झाले नंतर सर्वांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर एक चिठ्ठी येते त्यामध्ये खरोखरच बॉम्ब ठेवल्याचे व याआधी प्रॅक्टीस होती, खरी टेस्ट आता होईल, असे लिहले होते. त्यांनी यावेळेला मॅसेज पाठवलेला असतो व त्याचाच अर्थ लागत नसतो, त्यामुळे सर्वजण काळजीत असतात व वेगवेगळ्या प्रकारे अक्षरांची जुळणी करून मॅसेजचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असतात.

बायलिंग्वल म्हणजे तेच मशीन वापरून इंग्रजी, मराठी किंवा हिंदी यापैकी कोणत्याही भाषेची जुळणी करता येते. त्यामुळे इंग्रजीत जरी सव्वीसच अक्षंर असली, तरी पहिली आणि दुसरी अशी दोन लिप्या आहेत. म्हणजे एकच अक्षरं साधेही लिहिले जाते व कॅपिटलही, त्यासाठी शिफ्ट की वापरतात. साधी की वापरली की खालच्या पट्टीतली साधी अक्षरं. व शिफ्ट की वापरली की वरच्या पट्टीतली कॅपिटल अक्षरं येतात. तसेच मग मराठीत खालच्या पट्टीत एक अक्षर आणि वरच्या पट्टीत एक अक्षरं. फरक इतकाच की इंग्रजीमध्ये खालच्या आणि वरच्या पट्टीत लिपी वेगळी असली, तरी अक्षर तेच असते. मराठीत मात्र दोन् पट्ट्यांमधली अक्षर वेगवेगळी असतात.

अशाप्रकारे खालची पट्टी व वरची पट्टी यामुळे मॅसेजचा अर्थ लागतो. 'डिणाळां रुक्षश्रज्ञ' याचा अर्थ 'हिमालय ४७१५' म्हणजे हॉटेल हिमालय खोली नं. ४७१५. सगळी खालच्या पट्टीतलीच अक्षर होती. मात्र ती लिहिताना वरची पट्टी वापरली होती. अशाप्रकारे प्रस्तुत कथेत लांडगा आला रे आला या गोष्टीसारखी परिस्थिती होती. शेवटी मॅसेजचा अर्थ लागतो व सर्वांची चिंता दूर होते.

**६. चष्मदीद गवाह :-**

अमृतरावांनी आजवर मोठ्यामोठ्या चक्रावून सोडणाऱ्या केसेस हाताळल्या होत्या. तशीच एक वेगळी केस त्यांच्याकडे आली होती. 'अर्देशीर बलसारा' या बड्या उदयोगपतीचा खून झाला होता. अनेक उदयोगधंदयामध्ये त्यांनी चालवलेल्या किंवा त्यांच्या मालकीच्या कंपन्या आघाडीवर होत्या. बलसारांच्या बंगल्याच्या बागेत हिरवळीवर त्यांचा खून झाला होता. डॉ.कौशिक व

अमृतराव या केसची माहिती मिळवतात व खून होतेवेळी हजर असणाऱ्या मंडळीना चौकशीसाठी बोलावतात.

बलसारांच्या बंगल्याच्या बागेत त्यांनी एक छोटीशी पार्टी अरेंज केली होती. चौघाजणांना जेवायला बोलावलं होते. सत्पाल तेजा, आदित्य शर्मा, के.माधवन आणि इंद्राणी घोष. जेवणापूर्वी ड्रिंक्स घेत सगळेजण बागेत बलसारांच्या आवडत्या ऱ्होडोडेन्ट्रॉनच्या झुडपाजवळ बसले होते.

सत्याल तेजा त्यांचा प्रतिस्पर्धी होता. तेजाची कंपनी दिवाळखोरीत गेल्यामुळे नाईलाजाने त्याने आपली कंपनी बलसारांच्या कंपनीत सामील केली होती. तसेच आदित्य शर्मा अतिशय हुशार, तल्लख बुद्धीचा कॉर्पोरेट मॅनेजर अशी त्याची ख्याती होती. बलसारांच्या कंपनीला यशस्वी करण्यात त्याचा फार मोठा वाटा होता. या दोघांना मॅनेजिंग डायरेक्टर होऊ असे वाटत होते. परंतु बलसारानी आपला मुलगा मिनू बलसारा यालाच हे पद दिले. त्यामुळे या दोघांचा बलसारावर राग होता. तर माधवन हा बलसाराचा फार जुना सहकारी मित्र त्यानेच बलसारांना पुढे आणले होते. आपल्या कंपनीत बलसाराला भागीदार करून घेतले होते. वीस पंचवीस वर्षापूर्वी बलसारा जवळजवळ बेकारच होता. त्यांनी माधवनची कंपनी नावारूपाला आणली आणि ती स्वतःच बळकावून बसला. त्यामुळे माधवनच्या मनात त्यांच्याविषयी द्वेष होता.

इंद्राणी घोष बलसारांचं एक प्रेमपात्र. ती त्यांची सेक्रेटरी होती. नंतर गर्लफ्रेंन्ड म्हणून तिला बढती मिळाली होती. आता मात्र तो तिच्याकडे फार फिरकत नसे. त्याच्या आयुष्यात अनेक स्त्रिया आल्या होत्या. पार्ट्यांमध्ये देखील निरनिराळ्या स्त्रियांच्या सहवासात तो असे.

ह्या चौघांव्यतिरिक्त तेथे कोणीही नव्हते. खून करण्याचे कारण सर्वाजवळ होते. पण खून झाला तेंव्हा आपण तेथे नव्हतो, असे सगळेजण सांगतात. माधवनला कुणाचातरी तरी फोन आला होता. इंद्राणी रातराणीच्या झाडाजवळ त्याचा सुगंध घेत होती. तिला रातराणीचं वेड होतं. तेजा गाडीत पेपर्स विसरले होते, ते आणायला गेला होता. आदित्य टॉयलेटला गेला होता. तेव्हा खून नेमका कोणी केला याचा शोध डॉ.कौशिक व अमृतराव यांना लावायचा असतो.

डॉ.कौशिक हे खऱ्या खुन्याचा शोध लावतात. या कृत्याचे साक्षीदार दोन ऱ्होडोडेन्ट्रॉनची झाडे असतात. झाडांनाही संवेदना असतात, हे जगदीशचंद्र बोसांनी केव्हाच दाखवून दिलं होतं. त्या संवेदनांचं विश्लेषण करणार यंत्रही त्यांनी बनवलं होतं. तेच यंत्र डॉ.कौशिकांच्या पेटीत होतं. ही झाडे आपला आनंद, दुःख, राग, व्यक्त करतात. ही झाडं बलसारांची आवडती होती. ज्यांनी खून

केला त्यांविषयी या झाडांना राग येणार. कारण त्या खुन्याने झाडांना तुडवत बलसारांच्या डोक्यात पहार मारली होती.

हे यंत्र सेट केल्यावर कौशिकांनी तेथील उपस्थितांची टेस्ट केली. माळ्याविषयी त्या झाडाला प्रेम होते. माळी झाडाजवळ गेल्यानंतर झाडांनी जी प्रतिक्रिया व्यक्त केली त्याविरूद्ध प्रतिक्रिया माधवन झाडाजवळ गेल्यावर झाली. इतर जण जवळ असताना यंत्राने कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही, नंतर माधवननीच खुन केल्याचे कबुल केले. शेवटी ही झाडेच या खूनाचा 'चष्मदीद गवाह' असल्याचे सिद्ध होते.

**७. रक्ताचा रिपोर्ट :-**

राजाराम माने हा एक तरूण, हुशार सबइन्स्पेक्टर होता. त्याने आपल्या हुशारीने, कामाच्या तळमळीने अमृतरावांना जिकून घेतले होते. नंतर त्याने बदली मागितली होती. रश्मी सावंतशी त्याचे प्रेमप्रकरण होते. राजा व रश्मी दोघे लग्न करणार असतात. पण तिचा खून होतो, व त्याचा आरोप राजाराम याच्यावर येतो. तर तो तिचा खून झाल्यावर स्वत: आत्महत्या करतो. तो निर्दोष आहे हे सिद्ध करा, असे त्याची बहीण विजया माने अमृतरावांना सांगते.

अमृतरावांकडे केस आल्यावर ते खुनासंबंधी सर्व माहिती गोळा करताना इन्स्पेक्टर बापट त्यांना एक फाईल देतात. अमृतरावांनी असे रागाच्या तिरमिरीत झालेले गुन्हे 'क्राइम्स ऑफ पॅशन' पाहिले होते. राजारामसारख्या एका उमदया, होनहार, तरूण हुशार पोलिस ऑफिसरचा या भावनोद्रेकापायी बळी जावा याचचं त्यांना दु:ख होतं.

डॉ.कौशिक व अमृतराव यांनी रश्मीचा खून झाला ती आणि राजारामची आत्महत्या झाली ती जागा पाहिली. तिथे रक्त सांडले होते त्याची तपासणी केली. त्यावर काही नोंदी केल्या. विलासराव पाटील हे आमदार होते. त्यांनीही आपल्याला राजारामने गोळी मारल्याचे सांगितलेले असते. व त्यामध्ये त्यांचा कुडता रक्ताने भिजलेला असतो. त्याचीही तपासणी केली जाते. रश्मी, राजाराम व विलासराव यांच्या रक्ताचे नमुने गोळा केल्यानंतर खरा खूनी सापडतो.

विलासरावांनीच रश्मीचा खून केलेला असतो. तो राजारामने पाहिलेला असतो. म्हणून त्याचाही खून केला जातो. आणि स्वत:ला गोळी लागल्याचे खोटे नाटक विलासरावांनी केलेले असते. पण रक्ताच्या रिपोर्ट वरून खरा खून कोणी केला, हे शोधून काढले जाते. कारण

विलासरावांच्या सदऱ्यावर रश्मीच्या व राजारामच्या रक्ताचे डाग होते. त्यावरून रक्ताचे डी.एन.ए. केले जाते व खरा खुनी सापडतो.

**८. शुद्ध बीजापोटी :-**

सुनील वर्मा याने नयना लखोटिया हिचा खून केलेला असतो. त्याविरूद्ध कोणताही ठोस पुरावा नसल्याने अमृतरावांना त्यांना अटक करता येत नव्हते. अमृतराव दिवसरात्र त्या केसच्या विचार करत असल्यामुळे त्यांच्या पत्नी उत्काताई याही वैतागत. नंतर अमृतराव व डॉ.कौशिक या खुनाचा कसून तपास करतात.

सुनील वर्मा 'पीपल्स राईटस सोसायटीचा' चेअरमन होता. मुळचा दिल्लीचा असलेल्या सुनील वर्मांने सोसायटीच्या कामाच्या निमित्ताने अलिकडे कोट्याजवळ आपल बस्तानं बसवलं होतं. नयना ही त्या पीपल्स राईटस सोसायटीची सेक्रेटरी होती. खून झाला तेव्हा नयना, सुनील वर्मा बरोबर होती. तिला दारू आणि ड्रग्ज यांचा ओव्हरडोस दिला गेला. पोस्टमार्टचा तसा रिपोर्ट होता. कचऱ्याच्या बादलीतून काचांचे तुकडे मिळाले त्यावर नयनाचे फिंगरप्रिन्टस आणि लिपस्टिकचे ठसे मिळाले होते.

सुनीलचे गावाबाहेरच्या माळरानावर फार्महाऊस होते. तेथे टाटामोबाईल गाडीमधून नयनाला त्याने नेले होते. त्या गाडीला ओरखडा पडलेला असतो. तसेच त्या गाडीमध्ये बाभळीच्या बिया व पाने असतात. डॉ.कौशिक व अमृतराव सर्व पाहणी करून पुरावे गोळा करतात व सुनील वर्मांने खुन केल्याचे निष्पन्न होते.

**९. पळपुटा हेर :-**

या कथेत अण्णेगिरी यांनी रिसर्च स्टेशनवर कोंबड्या पाळलेल्या असतात. त्यामधील एक कोंबडी तेथून पळते. ती का पळून जाते, यांचा शोध लावण्यासाठी अण्णेगिरी हे अमृतराव व डॉ. कौशिक यांच्याकडे जातात. दोघेही सर्व पाहणी करतात. त्या कोंबडीचेही निरीक्षण करतात. तेव्हा त्या कोंबडीच्या पोटात टेपरेकॉर्ड बसविले आहे हे त्यांना कळते. कोंबडीचे एक्स-रे काढतात तेव्हा हे स्पष्ट होते. ही कोंबडी इतर कोंबड्यापेक्षा धष्टपुष्ट असते. तसेच इतर कोंबड्यात जास्त मिसळत नाही हे ही डॉ.कौशिक व अमृतराव यांच्या लक्षात येते.

अण्णेगिरी यांचे सरकारी प्रोजेक्ट हे गुप्त स्वरूपाचे होते. त्यामुळे गुप्ततेसाठी, कोंबड्याच्या सुरक्षिततेसाठी कोंबड्यांचे पिंजरे पाठच्या भागात कुंपणापासून दूर नेले होते. तसेच तेथे कडक

बंदोबस्त केला होता. अण्णेगिरी यांना बरेच स्पर्धक होते. त्यांनीच असे केले होते. त्यांच्या इथे जे गुप्त बोलणे होईल ते त्या कोंबडीमध्ये रेकार्ड होत होते. इंनिथवाले हे त्यांचे स्पर्धक होते. त्यांनी आपल्याकडची पोटात टेपरेकॉर्डर लपवलेली कोंबडी कुंपणावरून सोडून दिली व तेथील कोंबडी काढून घेतली. त्यामुळे मोजणी करताना कुणाला संशय आला नाही.

अशारितीने पळपुटा हेर या कथेत हेर कोंबडी असते. हेर मानवी असो की, पक्षी जातीतला असो, उडणारा असो कि पळपुटा असो. तो डॉ.कौशिक व अमृतराव यांच्या तावडीतून सुटत नाही, हे या कथेत दिसते.

**१०. बिंब प्रतिबिंब :-**

जानकीबाईच्या मृत्यूची केस अमृतरावांकडे आल्यावर ते या केसचा तपास सुरू करतात. डॉ.नातू हे जानकीबाईनां इंजेक्शन देतात व त्यांचा मृत्यू होतो. तेव्हा स्वतः याबाबत ते पोलिसांना कळवितात. जानकीबाईनी आपली सर्व इस्टेट आपला पुतण्या रविंद्र देशमुख ऐवजी डॉ.नातू यांचे नावे केलेली असते. काही दिवसापूर्वी मृत्यूपत्र केले होते. तसेच जानकीबाईचा मृत्यू हा नैसर्गिक आहे, असे डॉ.नातूना सांगता आलं असतं. परंतु त्यांनी तसे केलं नाही व पोलिसांना सांगितले.

डॉ. कौशिक व अमृतराव हे केमिकल ॲनॅलायझरकडे जातात व तिथे औषधाची चौकशी करतात, नंतर 'ऑप्टिकल ॲक्टिव्हिटी टेस्ट' ही करतात. यामुळे बाटलीतले औषध हे इतर स्टॉकमधल्या औषधापेक्षा निराळ्या रुपाचं आहे हे सिद्ध होतं. या दोन रुपांचा सजीव प्राण्यांवर होणाऱ्या परिणामामध्ये जमीन अस्मानाचा फरक असतो. म्हणजे एकच औषध पण त्यांच्यावर प्रकाशकिरण सोडले तर त्यात बदल होतात. उदा. थॅलिडामाईड औषध, त्याचा एक आयसोमर उलट्यांवर अतिशय गुणकारी तर दुसरा मार्ग अत्यंत विषारी असतो.

डॉ. नातू व रविंद्र देशमुख दोघांशी चर्चा केल्यावर त्यांना समजते की डॉ.नातू यांना ऑप्टिकल आयसोमरची माहिती नव्हती. याउलट रविंद्र ऑरगॅनिक केमिस्ट असल्याने आयसोमर बनवणं त्याला सहज शक्य होते.

अशारीतीने ऑप्टिकल ॲक्टिव्हिटी टेस्टने खऱ्या खुन्याचा शोध लागतो. रविंद्र खुराना याने खून करून त्याचं बालंट डॉ.नातूवर जाईल, याची चोख व्यवस्था केली होती व सर्व इस्टेट आपल्याला मिळेल असा विचार केला. परंतु तो डॉ.कौशिक व अमृतराव यांच्या तावडीतून सुटू शकत नाही. अशाप्रकारे खऱ्या खुन्याचा शोध लागतो.

११. एकाच दगडात दोन पक्षी :-

अतिशय सुंदर, रुपवान, बुद्धिमान पत्नी मिळाल्यामुळे अर्जन वाच्छानी स्वत:ला भाग्यवान समजत होता. सावित्री ही त्याची पत्नी नुसती सुंदरच नव्हती तर हुशारही होती. फिजिक्स सारख्या विषयात एम्.एस्सी. ची पदवी फस्ट क्लास डिस्टिंक्शन सह तिने मिळवली होती. अर्जनचे तिच्यावर खूप प्रेम होते. अर्जन तिला फुलासारख जपत असे. तिची प्रत्येक इच्छा पूर्ण करीत असे. तरीही सावित्री इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्समध्ये रिसर्च असोसिएट म्हणून नोकरी करत होती.

सावित्री सुंदर असल्याने तिच्यामागे डॅनी परेश नावाचा मजुनूमियाँ लागलेला असतो. तो फ्लोअर मॅनेजर असतो. तो तिच्या प्रेमात पागल झाला होता. याबाबत सावित्रीने पती अर्जन वाच्छानीला सांगितले असता, तो खूप चिडतो व डॅनी परेराच्या घरी जावून त्याला हाणामारी करतो व त्याला धमकी देऊन ऑफिसात जातो. परंतु दुर्देवाने त्याच दिवशी डॅनीचा मृत्यू होतो व आरोप अर्जन वाच्छानीवर येतो.

डॉ.कौशिक सर्वांची स्टेथॉस्कोप तपासणी करतात. तेव्हा त्यांना दिसते की, सर्वांची हृदय डाव्या बाजूला मात्र सावित्रीच उजव्या बाजूला. म्हणजे सावित्री ही सावित्री नसून तिचं प्रतिबिंब असते. सावित्रीने स्वत:च्या वैज्ञानिक प्रयोगाचा स्वत:वरच प्रयोग केलेला असतो. निष्कर्षाअंती सावित्रीनेच खून केल्याचे स्पष्ट होते.

तात्पर्य डॉ. कौशिक व अमृतराव यांच्या चाणाक्ष नजरेतून गुन्हेगारच काय, त्याचे प्रतिबिंब सुध्दा सुटू शकले नाही. हे या कथेतून दिसून येते. या कथेतील नायिका सावित्रीने प्रियकर डॅनी व पती अर्जन अशा दोघांना लक्ष्य केले व एका दगडात दोन पक्षी मारण्याचे ठरविले. डॅनीचा खुन केला व त्याचा आरोप पतीवर येऊन त्याला शिक्षा होईल असे तिला वाटले. पण डॉ. कौशिक व अमृतराव यांच्यामुळे खरा खुनी सापडतो.

१२. पिण्याला थेंबही नाही :-

'पिण्याला थेंबही नाही' या कथेत रिटाचा मृत्यू एक्स्टेन्सिव्ह पनिशियस सिस्टेमिक डिहायड्रेशनने झालेला असतो. पाणी पाणी करत तहानेने मेलेली रिटा ही पोलिस कमिशनर अमृतराव यांच्या जिवलग मित्राची मुलगी असते. त्यांनी तिला अगांखांदयावर खेळवले होते. त्यांच्या मित्राच्या मनाविरूध्द रिटानं प्रणबशी लग्न केले म्हणून मित्राने प्राण सोडला होता आणि आता रिटाचाही मृत्यू झाला होता. हा मृत्यू नैसर्गिक नसून खून असावा असे अमृतरावांना वाटते व

अतिशय जिव्हाळ्याने ते या केसचा तपास करतात. त्यांच्या जोडीला रिटायर्ड व अत्यंत हुशार सांयटिस्ट डॉ.कौशिक हे असतातच.

रिटा पित होती त्या बाटल्यातील पाण्याची तपासणी केली जाते. तेव्हा असे आढळते की, ते पाणी जडपाणी (हेवी वॉटर) होते. साधेपाणी नाही. त्यामुळं तिच्या शरीरात पाणी होते परंतु ते जडपाणी असल्यामुळे त्याचा वापर जगण्याला आवश्यक असणाऱ्या प्रक्रियेसाठी होत नाही. पाणी न मिळाल्याने तिच्या पेशी सुकून गेल्या.

रिटाचा नवरा प्रणब डयुटेरियमवर रिॲक्टरमध्ये वापरल्या जाणाऱ्या पदार्थावर रिसर्च करत असतो. त्यामुळे हेवी वॉटर मिळवणे त्याला सहज शक्य होते. त्याने रिटाच्या बाटल्यातील पाणी बदलले व तिचा मृत्यू पाण्याअभावी झाला. तात्पर्य रिटाच्या शरीरात पाणी साचून राहिले व त्या पाण्याचा उपयोग तिला झाला नाही. त्यामुळे खून करणारा तिचा नवरा प्रणब असतो हे सिद्‌ध होते.

तात्पर्य,'खिडकीलाही डोळे असतात' हा बाळ फोंडके यांचा उत्कृष्ठ विज्ञानकथासंग्रह आहे. यामधील चंद्रगुप्ताची अंगठी, यमघंटा, खिडकीलाही डोळे असतात, दिसतं तंस नसतं, शुद्‌ध बीजापोटी आणि पळपुटा हेर यासारख्या विज्ञानकथा विविध विज्ञानसुत्रांचा वापर करून लिहिल्या आहेत. तसेच नवनवीन विज्ञान विषयाचा वापर करून त्यांची कथात्मक गुंफन सुरेख केली आहे. प्रत्येक कथा ही वैशिष्टयपूर्ण वेगळी आहे. तसेच त्यांच्या बहुतेक कथा विज्ञानयुग, धनंजय, अमृत या दिवाळी अंकामध्ये प्रसिद्‌ध झालेल्या आहेत.'[१]

## २. 'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञानकथा संग्रहाची भाषाशैली :-

विज्ञानकथा ही विशिष्ट दृष्टिकोन समोर ठेवून वाचली जाते. म्हणून विज्ञानकथेमध्ये भाषाशैलीला महत्त्व आहे. विज्ञानकथा एखादया शोधावर किंवा एखादया विज्ञान सूत्रावर आधारित असते. ते विशिष्ट सूत्र किंवा शोध वाचकाच्या मनावर ठसविण्यासाठी साधी सोपी पण आकर्षक भाषाशैली असणे आवश्यक असते.

डॉ.बाळ फोंडके यांची भाषाशैली विज्ञानकथेला समर्पक अशी आहे. त्यांच्या मराठी भाषेत साधेपणा आहे. पण त्यांचबरोबर विज्ञानविश्वाची वातावरण निर्मिती करण्यासाठी आधुनिक वैज्ञानिक जगतातील इंग्रजी मिश्रित संवादशैलीचा ही ते वापर करतात. तसेच आवश्यक तेथे पारिभाषिक शब्द ही वापरतात. 'अग्निपरीक्षा त्या मुकुटाची नाही कौशिक. अग्निपरीक्षा होती

तुमच्या त्या आर्किमिडीजची' (पृष्ठ क्र.३ चंद्रगुप्ताची अंगठी) असे उद्‌गार अमृतरावांनी चंद्रगुप्ताची अंगठी या कथेत कौशिकांना उद्देशून काढले आहेत.

कथानक विज्ञानाच्या अंगाने फुलविताना गूढ रहस्यमयतेचा आभास करण्याचे कौशल्य त्यांच्या शैलीत आहे. त्यामुळे जिज्ञासा निर्माण करणे, ती टिकवून ठेवून वाचकाला कथानकाबरोबर पुढे नेणे हेही कसब त्यांनी साधले आहे. त्यांच्या विज्ञानकथा लोकप्रिय होण्याचे हे महत्त्वाचे कारण आहे. ते वास्तवाभासासाठी म्हणी, वाक्यप्रचारांचा वापर अगदी स्वाभाविकतेने करतात. सौम्य, मार्मिक विनोदाचा वापरही त्यांच्या कथेत आढळतो. 'भिंतीला कान असतात' या मराठी पारंपारिक वाक्यप्रचारांवरुन त्यांनी आपल्या एका कथेला 'खिडकीलाही डोळे असतात' हे नाव दिले आहे. यावरूनही त्यांच्या भाषा व्यवहारातील सौंदर्यदृष्टी दिसून येते.

'सतीश नागपालकडे पैसा आहे म्हणून त्यानं ही खिडकी घेतली.तिच्यापाठचं तत्त्व समजून घेण्याच्या भानगडीत तो पडला नाही. तसा प्रयत्न त्यानं केला असता तर त्याला समजल असत की, भिंतीला जसे कान असतात तसे खिडकीलाही डोळे असतात'. (पृष्ठ क्र.५१ खिडकीलाही डोळे असतात.)

डॉ.बाळ फोंडके यांची भाषाशैली कथानकाला योग्य अशी वातावरणनिर्मिती करणारी आहे. त्यांची भाषा साधी, सहज अवगत होणारी आहे. त्यांच्या कथेत निवेदनाच्या माध्यमातून गूढ बाहेर पडताना दिसून येते. त्यांच्या कथांमध्ये हिंदी, इंग्रजी, भाषेंचा वापर केलेला दिसतो. साहित्यिक आपला अनुभव भाषेंच्याद्‌वारेच वाचकांसमोर ठेवत असतो. भाषा हे साहित्यिकाचे अभिव्यक्तिचे एकमेव साधन ठरते. डॉ.बाळ फोंडके आपल्या कथेमध्ये निवेदनासाठी नागर भाषा वापरतात. कथेतल्या बहुतांश पात्रांच्या तोंडी शहरी भाषा आहे. अगदी तुरळक प्रमाणात ग्रामीण बोलीचा वापर आढळतो. तसेच कथेतील पात्रे ही उच्चशिक्षित व शहरी असल्यामुळे ती शहरी इंग्रजीमिश्रित भाषा वापरतात.

डॉ.बाळ फोंडके यांचे वास्तव्य शहरातच असल्याने शहराशी त्यांच्या चांगला परिचय आहे. त्यामुळे शहरी भाषेची अचूक जाण त्यांना आहे. तसेच त्यांची भाषाशैली ही एखादया सराईत ललित लेखकासारखी आहे. त्यांनी केलेल्या स्थळांचे, व्यक्तींचे, विज्ञानाचे, प्रसंगांचे वर्णन पाहण्याजोगे आहे. बाळ फोंडके आपल्या भाषिक सामर्थ्याने विशिष्ट भाषेतून प्रसंग, व्यक्तिरेखा, त्यातील विज्ञान वाचकासमोर उभे करतात.

तसेच त्यांच्या विज्ञानकथेतून म्हणी, वाक्यप्रचार, सुभाषित यांचाही वापर योग्य ठिकाणी केलेला दिसतो. कथानकाला गती देण्याचे काम जसे संवाद करतात. तसेच स्वभावदर्शन घडविण्यात

ही संवादाचा मोठा वाटा दिसतो. फोंडके यांच्या विज्ञानकथेत संवादाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. काही कथांमध्ये कथानकाला पुढे नेण्याचे काम संवादाने केले आहे.

बाळ फोंडके व्यक्तिचित्रणही अतिशय बारकाईने करतात. व्यक्तिरेखांचे हुबेहुब वर्णन करतात. त्यामुळे ती व्यक्तिरेखा आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. उदा. 'चंद्रगुप्ताची अंगठी' या कथेत म्युझियमचे क्युरेटर डॉ.पारेख यांचे सुरेख वर्णन केले आहे. डॉ.पारेख व्यासंगी गृहस्थ होते रवींद्रनाथ टागोरांसारखी गळ्याच्या खाली उतरणारी दाढी आणि मानेवर रूळणारे केस, सोनेरी काड्यांचा चष्मा त्याच्या काचांआडून रोखून पाहणारे तेजस्वी डोळे आणि चेहऱ्यावरचा सात्विक भाव. अशाप्रकारे एखादया प्रसंगाचे वर्णनही ते अतिशय सहजतेने करताना दिसतात. त्याचप्रमाणे 'एकाच दगडात दोन पक्षी' या कथेत "मी किती भाग्यवान आहे !" अर्जन वाच्छानी पंधराव्यांदा स्वत:ला उद्देशूनच म्हणाला. स्वत:च्याच घराच्या बाल्कनीत तो समुद्राची मंद गाज ऐकत बसला होता. कोजागिरी जवळ आली होती. आकाशात चंद्र पूर्ण आकाराला पोचण्याच्या अपेक्षेत उत्तेजित झाल्यासारखा अधिक दुधाळ प्रकाशाचा प्रसन्न शिडकावा करीत होता. येणाऱ्या हिवाळ्याची चाहूल अंगावर सुखद शिरशिरी आणणाऱ्या झुळुकेने मिळत होती. आणि आपला आवडता फ्राइड राइस व चिली चिकन चापून तृप्त मनाने आणि पोटाने अर्जन त्या डिशेस त्याची आवड लक्षात ठेवून बनवणाऱ्या सावित्रीचा विचार करीत होता.

त्यांची भाषाशैली मनोरंजक व वाचकांना उद्बोधन करणारी आहे. तसेच वेगवेगळ्या विज्ञानसूत्राचा वापर करून कथा आकर्षक पद्धतीने गुंफलेल्या आहेत. विविध म्हणी व वाक्यप्रचारावरून ते आपल्या कथांना नावे देताना दिसतात. उदा. दिसतं तसं नसतं, लांडगा आला रे आला, खिडकीलाही डोळे असतात, एकाच दगडात दोन पक्षी इ. अशा प्रकारची नावे कथांना देणे हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य दिसते.

डॉ.बाळ फोंडके यांच्या 'खिडकीलाही डोळे असतात' या रहस्यविज्ञानकथा संग्रहातील भाषाशैली ही वैशिष्टयपूर्ण आहे. डॉ.फोंडके यांनी ओघवत्या शैलीत विज्ञानकथा लिहल्या आहेत. डॉ.फोंडके यांना विविध शास्त्रांचे ज्ञान व आजूबाजूच्या सर्वकल वास्तवाचे भान असल्याचे त्यांच्या विज्ञानकथांतून दिसून येते. त्यामुळे त्यांचे विज्ञान साहित्य हे उत्कृष्ठ दर्जाचे विज्ञानसाहित्य ठरते.

'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञानकथासंग्रहात पोलिस कमिशनर अमृतराव व वैज्ञानिक डॉ. कौशिक या दोन व्यक्तिरेखा पहिल्या कथेपासून शेवटच्या कथेपर्यंत दिसून येतात. पोलीस कमिशनर अमृतराव हे हुशार, चाणाक्ष असतात. त्यांच्या मदतीला त्यांचे सायंटिस्ट मित्र डॉ.

कौशिक हे दोघे सर्व कथांमध्ये स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटवतात व खुनी कोण हे शोधून काढतात. त्यासाठी वैज्ञानिक शोध, सामग्रीचा उपयोग करतात.

'चंद्रगुप्ताची अंगठी' या कथेत संवादाचा वापर केल्याचे दिसते. नंगा वेडापीर, नाकी नऊ आणणे, सगळे बंडोबा सध्या तरी थंडोबा झाले, शुभस्य शीघ्रम, पैजेचा विडा उचलणे अशा म्हणी व वाक्यप्रचाराचा उपयोग केल्याचे दिसते. त्याचप्रमाणे देन बिगिन अॅट द बिगिनिंग, अॅट युवर सर्विस, यस यू हॅव अ पॉईट, आय.सी. अशा इंग्रजी शब्दांचा वापर केल्याचे दिसते. तसेच आर्किमिडीज, मास स्पेक्ट्रोग्राफ, ट्रेस एलिमेन्ट्स, फिंगरप्रिन्ट, डेटाबेस, कॉम्प्युटर, लेझर, केमिकल एलिमेन्ट्स यासारख्या वैज्ञानिक क्षेत्राशी संबंधित शब्दांचा ही समावेश यामध्ये आहे.

'यमघंटा' या कथेत 'आयत्या बिळात नागोबा' ही म्हण अगदी योग्य प्रसंगारूप अशी वाटते. त्याचप्रमाणे वैज्ञानिक क्षेत्राशी संबंधित बरेच शब्द या कथेत येतात. उदा.पेसमेकर, टेलिमेट्री, हार्टअॅटक, पोस्टमार्टम, सेल्युलर फोन, फ्रिक्वेन्सी, इ.

'खिडकीलाही डोळे असतात' या कथेतही बहुतेक ठिकाणी इंग्रजी संवादाचा वापर झालेला दिसतो. डॉ.कौशिक व कमिशनर अमृतराव हे नीताच्या खुनासंबंधी चौकशी करण्यासाठी डॉ.सतीश नागपालच्या घरी जातात, तेव्हा डॉ. कौशिक व डॉ.सतिश नागपाल यांच्यातील सहजसुंदर संवाद दिसून येतो. तो पुढीलप्रमाणे,

"सॉरी डॉक्टर नागपाल फॉर धिस इन्ट्र्युजन. खरं म्हणजे तुमची माझी ओळखं नसताना असं एकदम येऊन तुम्हाला रिक्वेस्ट करणं ठीक नाही. यू डोन्ट हॅव टू से यस."

"पण डॉ.कौशिक, तुमची रिक्वेस्ट काय ते तरी कळू दया. ती न सांगताच तुम्ही अॅपॉलॉजी का मागताय?"

"ओह, बेग युअर पार्डन. पण या अमृतरावांनी मला त्याविषयी सांगितल्यापासून मी इतका एक्साईट झालोय की-"

"-कशाविषयी सांगितलं या कमिशनरसाहेबांनी?"

"तुमच्या बेडरूममधल्या खिडकीविषयी. ती खिडकी-"

"-ओऽह ती खिडकी !"

"दॅट्स राइट .ती खिडकी पाहण्याची उत्सुकता लागून राहिलीय मला. इफ यू डोन्ट माईन्ड, कॅन आय सी इट ?"



UNIVERSITY, KOLHAPUR

"ओ ह सर्टनली. व्हाय नॉट ! मला वाटले तुम्ही या कमिशनरसाहेबांबरोबर आलात, तेव्हा नीताच्या खुनासंबंधीच काही विचारणा-"

"-नीताचा खून! कसला खून? आय डोन्ट गेट यू डॉक्टर."

"फर्गेट इट सर. तुम्हाला ती खिडकी पाह्यचीय ना, मग. या ना."

अशारीतीने अतिशय सहजपणे खुनाची चौकशी करून सर्व माहिती डॉ.कौशिक काढून घेत. खुनी माणसाला ते समजतही नसे व खरा खुनी सहज सापडत असे. डॉ.फोंडके यांची सर्वच कथांमधील संवादशैली ही ओघवती व इंग्रजी मिश्रित दिसून येते.तसेच हिंदी भाषेचाही अधून मधून वापर केल्याचे दिसते. उदा: जलनेवाले भी तो काफी है, कानून के हाथ लंबे होते है, खैर छोड दो, हुआ सो हुआ, अच्छाही हुआ, बहोत खुब अमृतराव, सुभानाल्ला अशा अनेक हिंदी शब्दांचा, वाक्याचा समावेश झालेला दिसून येतो.

तात्पर्यं, बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथासंग्रहामध्ये त्यांचे भाषिक सामर्थ्यं दिसून येते. मराठीबरोबरच त्यांनी त्यांच्या कथांमध्ये इंग्रजी, हिंदी, भाषेचा अतिशय सहजपणे वापर केलेला आहे. विज्ञान क्षेत्राशी संबंधित शब्दांचा सोप्या पद्धतीने वापर केला आहे. क्लिष्ट, दुबोध वाक्यरचना न करता अतिशय साध्या सरळ भाषेत त्यांनी कथा लिहल्या आहेत. त्यांची भाषाशैली विज्ञानकथेला समर्पक अशी आहे.

## ३. 'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञानकथा संग्रहातील व्यक्तिचित्रण :-

'खिडकालाही डोळे असतात' हा बाळ फोंडके यांचा रहस्यविज्ञानकथांचा संग्रह आहे. यामध्ये.पोलीस कमिशनर अमृतराव व त्यांचे वैज्ञानिक मित्र डॉ. कौशिक या व्यक्तिरेखा वैज्ञानिक दृष्टिकोनाने गुन्हेगारांचा शोध लावतात. सर्वच कथांमध्ये या दोन व्यक्तिरेखा महत्वपूर्ण आहेत.मानवी मन आणि वैज्ञानिक सत्य ह्या दोन सुत्रांच्या आधारे रहस्यमय वाटणाऱ्या गुन्हयांचा ते शोध लावतात. या सर्वच कथांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन असून या दोन व्यक्तिरेखा प्रधान ठरतात.

डेप्युटी कमिशनरच्या पदापर्यंत पोहचलेल्या अमृतरावांनी आजपर्यंत मोठमोठया चक्रावून सोडणाऱ्या केसेस हाताळल्या आहेत. त्यापैकी बरेच केसमध्ये त्यांना डॉ.कौशिकांची मदत झाली होती. 'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञानकथासंग्रहात पोलिस कमिशनर अमृतराव व वैज्ञानिक डॉ. कौशिक या दोन व्यक्तिरेखा सर्व कथांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. तसेच डॉ.कौशिक व अमृतराव यांच्या वैयक्तिक जीवनाची थोडी ओळखही कथेतून होते. कौशिक यांना

पाईपची सवय होती. रिकाम्या वेळी संगीत ऐकण्याचा छंद होता. तसेच दोघे जण सुट्टीत जाईल तेथे बुद्धिबळ खेळत. त्या दोघांची मैत्री खूप अतूट होती. अमृतरावांच्या अडचणीच्या वेळी डॉ.कौशिक हे नेहमी मदतीला धावून येत.

अमृतरावांच्या पत्नी उल्काताई याही खूप चांगल्या असतात. त्या अमृतरावांची खूप काळजी घेत असतात. अमृतराव हे सतत रात्रंदिवस केसचा विचार करत. अनेक अवघड असलेल्या केसही त्यांनी यशस्वी पार पाडल्या होत्या. एक कर्तबगार पोलिस कमिशनर म्हणून त्यांची ख्याती होती. त्यात त्यांच्या पत्नीचाही मोठा वाटा होता.

बाळ फोंडके यांच्या कथेतील इतर व्यक्तिरेखाही प्रभावी आहेत. व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून कथेला गूढ व रहस्य प्राप्त होते. सी.एम.माधव सबनीस, रावबाजी, डॉ.पारेख, हिरालाल शेटजी, नरेंद्र, ड्रायव्हर वडके, डॉ. सतीश नागपाल, नीता नागपाल, रवींद्र खुराना, वीरेंद्रराजे घाटगेपाटील, इन्स्पेक्टर प्रधान, अर्देशीर बलसारा, माधवन, इंद्राणी, राजाराम माने, विजया माने, आमदार विलासराव पाटील, सुनील वर्मा, नयना, प्रो. राजशेखर अण्णेगिरी, डॉ.नातू , रवींद्र, अर्जन वाच्छानी, सावित्री वाच्छानी, रिटा, प्रणब गांगुली अशा विविध स्त्री पुरूषांच्या वेगवेगळ्या प्रवृत्तींचे दर्शन त्यांच्या कथेतून घडते. तसेच त्यांच्या पात्रांच्या विविध प्रवृत्तींचे दर्शन, स्वभावाचे वेगळेपण त्यांच्या कथेतून जाणवते.

या कथासंग्रहात स्वार्थी, लोभी, धूर्त अशा विविध स्वभावाच्या व्यक्तिरेखा चित्रित झाल्या आहेत. जिद्द, अहंभाव, मत्सर, पैशाचा लोभ यासाठी खून, फसवाफसवी करणारी पात्रेही काही कथांमध्ये येतात. उदा. 'शुध्द बीजापोटी' या कथेत नयनाचा खून आणि 'बिंब प्रतिबिंब' मध्ये जानकीबाईचा खून, माणसांच्या हिंसक वृत्तीचे दर्शन घडवितो.

'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञानकथासंग्रहात पोलिस कमिशनर अमृतराव व डॉ. कौशिक या दोन व्यक्तिरेखा महत्त्वपूर्ण आहेत. या दोन्ही व्यक्तिरेखा सर्व कथेत आहेत. या दोन्ही व्यक्तिरेखा एकमेंकांच्या मदतीने आधुनिक विज्ञानाच्या साहाय्याने आरोपीचा शोध लावतात. चंद्रगुप्ताची अंगठी या कथेत, रावबाजी पसरेटवार, सी.एम.माधव सबनीस, डॉ.पारेख या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत. या व्यक्तींच्या स्वभावाचे, विचारांचे वर्णन येथे केलेले दिसते. उदा: रावबाजी पसरेटवार ही विलक्षण वल्ली होती. ते काहीना काही करामत करत, ते विरूद्ध पक्षाचे नेते होते. तसेच पूर्वी ते मंत्री देखील होते. तसेच म्युझियमचे क्युरेटर डॉ.पारेख हे व्यांसगी होते. रवींद्रनाथ टागोर यांच्यासारखी गळ्याच्या खाली दाढी आणि मानेवर रुळणारे केस, सोनेरी काड्यांचा चष्मा,

तेजस्वी डोळे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. ह्या केसमध्ये डॉ.पारेख हे अमृतराव व कौशिक यांना मदत करतात.

'यमघंटा' या कथेत हिरालाल शेटजी ह्या अतिशय प्रेमळ, दयाळू व्यक्तीचे तर इलाबेन यांच्या सुसंस्कृत वृत्तीचे, तसेच पुष्पाबेन व रणजित यांच्या स्वार्थी व खूनी वृत्तीचे दर्शन होते. पैशासाठी हे दोघे शेटजींचा मृत्यू घडवून आणतात. अशा तऱ्हेने दोन्ही प्रवृत्तींच्या माणसांचे दर्शन येथे होते.

'खिडकीलाही डोळे असतात' या कथेमध्ये नीता नागपाल, सतीश नागपाल, रवींद्र खुराना या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. डॉ. सतीश नागपाल हा आपल्या पत्नीचा नीता नागपालचा पैशासाठी तिला त्रास देवून खून करतो. त्याच्या हिंसक व लोभी वृत्तीचे दर्शन याठिकाणी होते. तसेच सतीशचे निलिमा कोहली बरोबर असलेले अनैतिक संबंध त्याच्या बाहेरख्यालीपणाचे दर्शन घडवितात.

'दिसतं तसं नसतं' या कथेमध्ये वीरेंद्रराजे घाटगेपाटील या राजकीय आसामीचा धूर्तपणा दिसतो. ते आपली सून सुमित्राराजे हिला जाळून मारतात. आपल्यावर संशय येऊ नये म्हणून ते दक्ष राहतात. त्यासाठी लेसर लाईटचा ते उपयोग करतात. वीरेंद्रराजे आधुनिक विज्ञानाचा वापर करून सुमित्राराजेचा खून करतात.

'चष्मदीद गवाह' या कथेमध्ये अर्देशीर बलसारा हे प्रधान पात्र आहे. तसेच सत्पाल तेजा, हुशार व बुद्धीमान आदित्य शर्मा, इंद्राणी घोष हे बलसारांचे प्रेमपात्र, मिस्टर माधवनं इ. व्यक्तिरेखा आहेत. अर्देशीर बलसारा संपत्ती, यश, देखणं व्यक्तिमत्त्व, इ. मिश्रण असलेले उदयोगपती होते. त्यांच्या आयुष्यात अनेक स्त्रियां येऊन गेल्या होत्या. त्यांच्या आयुष्यात मित्रांऐवजी शत्रुंची संख्या जास्त होती. बलसारांच्या स्वभावामुळेच त्यांचा खून होतो. असे हे बहुरंगी व्यक्तिमत्त्व येथे दिसते.

'रक्ताचा रिपोर्ट' या कथेमध्ये राजाराम माने, रश्मी सावंत, इन्स्पेक्टर बापट, आमदार विलासराव पाटील, काळे, सबइन्स्पेक्टर शिलेदार, विजया माने इ. पात्रांचा समावेश होतो. हुशार सबइन्स्पेक्टर राजाराम माने हा रश्मी सावंतशी लग्न करणार असतो. परंतु त्या दोघांचा खून होतो. दोघांचं एकमेकांवर प्रेम होतं. त्यांचा खून विलासराव पाटील करतात. त्यांचा नाटकी स्वभाव येथे दिसतो.

'शुद्ध बीजापोटी' या कथेत नयनाचा खून करणारा सुनील वर्मा याला राजकीय पाठबळ असल्यामुळे अटक झाली नव्हती, अशी ही वजनदार आसामी होती. भरपूर श्रीमंत व प्रतिष्ठित अशी

ही व्यक्तिरेखा कॉलगर्ल नयना लखोटीया हिचा खून करते. अशा वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्तिरेखा येथे चित्रित झालेल्या दिसतात.

'पळपुटा हेर' मध्ये प्रोफेसर राजशेखर अण्णेगिरी व त्यांच्या कोंबड्या यांचा समावेश होतो.

'बिंब प्रतिबिंब' यात जानकीबाई, डॉ.नातू , रविंद्र देशमुख या व्यक्तिरेखांचा समावेश होतो.

'एकाच दगडात दोन पक्षी' या कथेमध्ये बायकोवर प्रेम करणाऱ्या व सुंदर बायको फक्त आपल्यालाच आहे असे समजणारा, अर्जन वाच्छानी व त्याची पत्नी सावित्री वाच्छानी या दोन प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. याशिवाय डॅनी परेरा या व्यक्तिरेखेचाही समावेश होतो. सावित्री ही हुशार बुद्धीमान, गोरीपान, सुंदर अशी व्यक्तिरेखा आहे. याविरूद्ध तिचा नवरा अर्जन छाती,पोट सुटलेला दिसायला सामान्य आहे. सावित्रीला सुखात ठेवण्यासाठी तिची प्रत्येक इच्छा तो पूर्ण करीत असे. आपल्या बायकोला त्रास देणाऱ्यां मजनूमिया, रोमिओ ड्रॅनी परेरा याला तो ताकीद देतो.

सावित्री ही एम.एस्सी. फिजिक्स असून नोकरी करते. तसेच तिचा धूर्तपणा याठिकाणी प्रत्ययास येतो. डॅनीचा खून करून त्याचा आळ आपला नवरा अर्जनवर आणण्यांचा ती प्रयत्न करते. एकाच दगडात दोन पक्षी मारण्याचा तिचा डाव असतो व यासाठी ती आपल्या विज्ञानाची मदत घेते. अशा तऱ्हेने सुंदर, कुरूप, हळव्या, निष्ठूर अशा स्वभावांच्या व्यक्तींचे चित्रण येथे झालेले दिसते.

'पिण्याला थेंबही नाही' यात प्रणब गांगुली, रिटा या व्यक्तिरेखा आहेत. रिटाचा खुन तिचा नवरा प्रणब करतो. हा माणूस बेरकी व चलाख आहे. पाठीमागे कोणताही पुरावा न ठेवता तो तिला मारतो. प्रणब ड्युटेरीयमवर रिॲक्टरमध्ये वापरल्या जाणाऱ्या पदार्थावर रिसर्च करत असतो. हेवी वॉटर मिळवणं त्याला सहज शक्य होतं. त्यानं रिटाच्या बाटल्यांतील पाणी बदलून त्याजागी हेवी वॉटर ठेवले होते. त्यामुळे शरीरात पाणी असूनही पाणी पाणी करत तिचा मृत्यू झाल्याचे दिसते.

थोडक्यात या विज्ञानकथा संग्रहामध्ये वेगवेगळ्या स्वभावांच्या व्यक्तींचा, त्यांच्या आचारांचा समावेश होतो.

तात्पर्य, अशारीतीने या विज्ञानकथा संग्रहातील व्यक्तिरेखा प्रकट होतात. या व्यक्तींचे स्वभाव, त्यांचा स्वार्थीपणा, धुर्तपणा, दयाळूपणा, प्रेमळपणा, निष्ठूरपणा येथे दिसतो. त्यांच्या स्वभावाचे निरनिराळे कांगोरे दिसतात. यातील काही व्यक्तिरेखा धुर्त, महत्त्वाकांक्षी आहेत.

पैशासाठी, सत्तेसाठी, प्रतिष्ठेसाठी त्या आपल्या जवळच्या व्यक्तिचा खून करायलाही मागेपुढे पाहत नाहीत हे दिसते. तर यामधील काही व्यक्तिरेखा सरळ साध्या स्वभावाच्या भोळ्या आहेत. माणसांच्या स्वभावांच्या विविध वृत्ती, प्रवृत्तींचे दर्शन येथे होताना दिसते.

## ४. 'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञानकथा संग्रहाचे वेगळेपण :-

'खिडकीलाही डोळे असतात' हा बाळ फोंडके यांचा अतिशय रहस्यमय विज्ञानकथांचा संग्रह आहे. यातील भाषाशैली, रचनाशैली, संवाद कथेतील विज्ञान हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. या पुस्तकातील कथा हा रहस्यमय, गूढ व वाचकांची उत्कंठा वाढवणाऱ्या आहेत. प्रत्येक कथेचे स्वतंत्र स्थान आहे. या कथांतील पात्र, प्रसंग, घटना यात वेगळेपणा आहे. सर्व कथा आपला वेगळेपणा सिद्‌ध करतात.

बाळ फोंडके यांच्या या कथासंग्रहात कमिशनर अमृतराव व डॉ.कौशिक या दोन व्यक्तिरेखा प्रधान असून सुरुवातीपासून शेवटच्या कथेपर्यंत त्या सर्व कथांमधून दिसतात. या व्यक्तिरेखा प्रत्येक कथांमध्ये आपला स्वतंत्र ठसा उमटविताना दिसतात. अतिशय हुशारीने, चाणाक्षपणे, त्या केसेचा ते शोध लावतात. भावनिक गुंतागुंत फारशी दिसत नाही. तसेच विज्ञानकथांमध्ये असणारी अतिशयोक्ती येथे दिसत नाही. या कथा वास्तवाशी जवळीक साधताना दिसतात.

या कथासंग्रहातील कथांचे कथानक हे गतिमान आहे. यातील संवाद हे कथानकाला पुढे नेताना दिसतात. तसेच बहुतेक सर्व कथांमध्ये इंग्रजी, हिंदी शब्दांचा वापर केलेला दिसतो. तसेच योग्य ठिकाणी म्हणींचाही वापर केल्याचे दिसते.

या रहस्यमय कथांचे वेगळेपणा म्हणजे यात वापरण्यात आलेले आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान होय. यामध्ये रेडिओ कार्बन, फिंगर प्रिन्ट, होलोग्राम, इंटरनेट, स्लोग्लास खिडकी, लेसरलाईट, पोस्टमार्टम, टेप रेकॉर्डर, डी.एन.ए तपासणी यासारख्या विज्ञानाचा वापर अतिशय कलात्मकतेने केलेला दिसतो.

तात्पर्य, 'खिडकीलाही डोळे असतात' हा कथासंग्रह इतर कथासंग्रहापेक्षा वेगळा आहे. यातील कथा गूढ रहस्यमय असून कथेच्या शेवटी गूढ उकलताना दिसते. यातील व्यक्तिरेखा या वेगवेगळ्या विकृती-प्रवृतींच्या दिसतात. पैशा, सत्ता, सौंदर्य, प्रतिष्ठा, यासाठी दुसऱ्यांचा खून करणाऱ्या व्यक्तिरेखा यात आहेत.

तसेच कथेची कथात्मक गुंफण, भाषाशैली, संवाद, वातावरण निर्मिती, घटना, प्रसंग या सर्वच बाबतीत त्यांच्या कथामध्ये वेगळेपणा दिसून येते.

## ५. 'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञानकथा संग्रहातील विज्ञान :-

'खिडकीलाही डोळे असतात' हा रहस्यविज्ञानकथांचा संग्रह आहे. यामध्ये अनेक कथांमध्ये विज्ञानाचा उपयोग करून केसचा उलगडा होतो. रेडिओकार्बन डेटिंग, मास स्पेक्ट्रोग्राफ, फिंगरप्रिन्ट, इंटरनेट, कॉम्प्युटर, पेसमेकर, सेल्युलर फोन, स्लोग्लास खिडकी, होलोग्राम, लेसर लाईट, होलोग्राफिक प्रतिमा, ई-मेल, बॉम्ब डिस्पोजल स्कॉड, पोस्टमार्टम, डी.एन.ए. तपासणी, टेप रेकॉर्डर, ऑप्टिकल ॲक्टिव्हिटी, ऑप्टिकल आयसोमर, हेवी वॉटर यासारख्या वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा यातील कथांमध्ये उपयोग केलेला दिसून येतो.

'चंद्रगुप्ताची अंगठी' या कथेत चंद्रगुप्ताची अंगठी चोरीला गेलेली असल्यामुळे अंगठीचा खरेखोटेपणा ठरवण्यासाठी अंगठीचे रेडिओकार्बन डेटिंग केले जाते. पुरातन खननातून मिळालेली कोणतीही वस्तू नेमकी किती पुरातन आहे हे ओळखण्यासाठी ही वैज्ञानिक पद्धत वापरतात. त्यापद्धतीचा याठिकाणी वापर केला जातो. तसेच 'मास स्पेक्ट्रोग्राफ' या यंत्राचाही वापर याठिकाणी अंगठीचे फिंगरप्रिन्टस् घेण्यासाठी केला जातो.

इंटरनेटद्वारे जगात कुठंही एखादी माहिती उपलब्ध असेल तर ती आपल्याला घरबसल्या इंटरनेटवर मिळते. या कथेत इंटरनेटचा वापर करून खनिजांची माहिती मिळवली जाते. अशा खनिजांची इत्थंभूत माहिती अमेरिकेत स्मिथसोनियन संस्थेकडून मिळते. त्या माहितीचा आणि मास स्पेक्ट्रोग्राफमधून मिळवलेल्या चंद्रगुप्ताच्या अंगठीच्या फिंगर प्रिन्ट या दोन्हींमध्ये काहीही फरक नसतो. एक काळ्या व एक तांबड्या शाईतला कागद, एवढाच फरक सोडला तर त्या दोघांत विलक्षण साम्य होतं. यावरून ती अंगठी चंद्रगुप्ताचीच आहे हे सिद्ध होते व दोन्ही कागदोपत्री पुरावेही मिळतात. याकथेत डॉ. कौशिक अमृतरावांना म्हणतात -'आमच्या विज्ञानात असा एकतर्फी पुरावा असून चालत नाही. पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह दोन्ही प्रकारचे पुरावे सादर करावे लागतात. तेव्हा कुठं एखादा सिध्दांत मांडला जातो.' (पृष्ठ क्र.८, चंद्रगुप्ताची अंगठी)

'यमघंटा' या कथेत हिरालाल शेटजी हे हृदयविकाराने त्रस्त असल्याने त्यांना पेसमेकर बसवितात. त्यामुळे त्यांना सेल्युलर फोन वापरण्यास मनाई होती. तरीही त्यांची दुसरी पत्नी पुष्पाबेन त्यांच्या गाडीत सेल्युलर फोन बसवते व त्याच्या वापरामुळे शेटजींचा ॲटक येऊन मृत्यू होतो.

अशारितीने हा नैसर्गिक ॲटक नसून  घडविलेला असतो. विज्ञानाचा उपयोग याही ठिकाणी असा वाईट मार्गाने केल्याचे निदर्शनास येते. तसेच त्याचा दुरूपयोग केला तर वाईट परिणाम भोगावे लागतात, याचा येथे प्रत्यय येतो.

'खिडकीलाही डोळे असतात' ही कथा वैशिष्टपूर्ण असून याकथेत आधुनिक विज्ञानाचा वापर केलेला दिसतो. यातील स्लोग्लासची खिडकी ही आधुनिक विज्ञानाचे दर्शन घडविते. यात पतीने आपल्या पत्नीचा केलेला खून रेकॉर्ड झालेला असल्याने खूनीचा तपास लागतो. यातील खिडकीची काच ही आधुनिक होती. ही काच नेहमीच्या काचेपेक्षा वेगळी होती. त्या काचेत सर्वकाही रेकॉर्ड होत असते.

'दिसतं तसं नसतं' यातील वीरेंद्रराजे घाटगेपाटील यांनी होलोग्राम असलेली खिडकी बसवलेली असते. होलोग्रामचं वैशिष्टय असं असतं की, त्याचा कोणताही लहानातला लहान तुकडा घेतला तरी त्यातही तुम्हाला संपूर्ण थ्री डायमेन्शल चित्र दिसतं. डॉ.कौशिक व अमृतराव हे या काचेच्या तुकड्यांचा शोध लावतात. यावरून वीरेंद्रराजेंनी लेसर लाईटचा उपयोग करून स्वत:ची होलोग्राफिक प्रतिमा खिडकीपलीकडे असल्याचा अभास उत्पन्न करून आपली सून सुमित्राराजेंचा खून केलेचे सिद्‌ध हाते.

अशारीतीने वीरेंद्रराजेंनी अतिशय चालाखपणे आधुनिक लेसरचा उपयोग करून आपण आपल्या घरी होतो असे भासवण्याचा प्रयत्न केला. परंतु होलोग्राम खिडकीने सर्व उघडकीस येते. अशारीतीने आपला बचाव करण्यासाठी वीरेंद्रराजेंनी आधुनिक विज्ञानाचा असा दुरूपयोग केलेला दिसतो.

'डिणाळां रुक्षश्रज्ञ' या अक्षरांच्या संदेशाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न 'लांडगा आला रे आला' या कथेत केला जातो. कॉम्प्युटर हे बायलिंग्वल मशिन आहे. बायलिंग्वल म्हणजे तेच मशिन वापरून इंग्रजी, मराठी किंवा हिंदी या पैकी कोणत्याही भाषेतील मजकूराची जुळणी करता येते. फरक इतकाच की, इंग्रजीमध्ये खालच्या आणि वरच्या पट्टीत लिपी वेगळी असली तरी अक्षर तेच असतं. मराठीत मात्र दोन पट्ट्यांमधली अक्षर वेगवेगळी असतात. यावरूनच खालची पट्टी व वरची पट्टी वापरून  या संदेशाचा अर्थ लावला जातो. त्यामुळे बॉम्ब हॉटेल हिमालय, खोली नं. ४७१५ मध्ये ठेवल्याचे कळते व या गंभीर संकटावरून सर्वांची सुटका होते.

'चष्मदीद गवाह' या कथेमध्ये अर्देशीर बलसारा यांच्या खुनाचा संशय चार जणांवर असताना, खरा खुनी शोधण्यासाठी ऱ्होडोडेन्ट्रॉन झाडाचा उपयोग होतो. झाडे आनंद, दु:ख, प्रेम, राग, द्वेष व्यक्त करतात. हे जगदीश बोसांनी केंव्हाच दाखवून दिलं होतं. असंच एक यंत्र या झाडाजवळ ठेवल्याने हे झाड राग व प्रेम व्यक्त करते व खरा गुन्हेगार सापडतो. अशाप्रकारे आधुनिक यंत्राचा येथे वापर केलेला दिसतो.

'रक्ताचा रिपोर्ट' या कथेमध्ये राजाराम माने याने त्याची प्रेयसी रश्मी हिचा खून करून स्वत: आत्महत्या केली असा पोलिसांचा रिपोर्ट असतो. प्रत्यक्ष खून होते वेळी आ.विलासराव पाटील हे सुध्दा तेथे उपस्थित असतात व त्यांचा सदरा देखील रक्ताने माखलेला असतो. यावरून डी.एन.ए. तपासणीतून खरा खूनी समोर येतो.

'बिंब प्रतिबिंब'या कथेमध्ये जानकीबाईचा खून इंजेक्शन दिल्यामुळे होतो. औषधांचा तपास केल्यावर त्यांना दिलेल्या बाटलीतलं औषध व त्यांना दिलेल्या स्टॉकमधल्या औषधाच्या बाटलीतील औषध याचं ऑप्टिकल आयसोमर केलं जातं. तेव्हा कळते की दोन्ही औषधांमध्ये रासायनिक गुणधर्म सारखे होते. पण बायॉलॉजिक गुणधर्म वेगळे होते. त्यामुळे जानकीबाईच्या बाटलीतलं औषध व केमिस्ट स्टॉकमधील औषध यामध्ये रासायनिक दृष्ट्या साम्य असले तरी त्यात फरक होता व प्रकाश किरणामुळे त्या औषधात बदल केलेला असतो. या कथेत ऑप्टिकल ॲक्टिव्हिटी टेस्टने केसचा तपास लागतो.

सावित्री ही एलिमेंटरी पार्टिकलच्या एकसाथ, एकसंघ झोताची निर्मिती करण्याचे काम करत असते. एलिमेंटरी पार्टिकल्स स्वत:भोवती गिरकी घेत असतात. त्यामुळे त्यांच्या अंगी स्पिनचा गुणधर्म असतो. क्वान्टम सिद्धांतानुसार या स्पिनची दिशा नैसर्गिक रूपात कोणतीही असू शकते. एका झोताच्या सर्व पार्टिकल्सच्या स्पिनची दिशा एकसाथ करणं म्हणून तर अवघड असते. अशा झोतामध्ये एक नवीन शक्ती येते. त्यांच्या प्रभावक्षेत्रात आलेल्या कोणत्याही वस्तूचं त्यांच्या प्रतिबिंबात रूपांतर होते. अशा आधुनिक विज्ञानाचा यात वापर होतो.

सावित्री ही या वैज्ञानिक प्रयोगाचा स्वत:वरच प्रयोग करते व डॅनीचा खून करते व आरोप नवऱ्यावर येतो. परंतु ती सावित्री नसून तिचे प्रतिबिंब असते. अशाप्रकारे ती एका दगडात दोन पक्षी मारण्याचा प्रयत्न करते. त्यासाठी एलिमेंटरी पार्टिकलचा उपयोग करते.

रिटाचा मृत्यू एक्स्ट्रोन्सिव्ह पर्निशियस सिस्टेमिक डिहायड्रेशनने झाल्याचे ती पीत असलेल्या पाण्याची टेस्ट केल्यावर निष्पन्न होते. त्यामुळे तिच्या शरीरात पाणी असूनही तिचा मृत्यू पाणी पाणी करत होतो कारण जड पाण्याचा उपयोग शरीरातील क्रियांसाठी होत नाही.

या कथेतील विज्ञान म्हणजे साधं पाणी **$H_2O$** आणि हेवी वॉटर **$D_2O$** हे अणूभट्ट्यामध्ये वापरले जाते. त्याचा आयसोरोप असलेला भारी डयुटेरियम वापरले की झालं जड पाणी **$D_2O$**. हायड्रोजनचा अणुभार आहे एक, तर डयुटेरियमचा दोन यामुळे जड पाणी वजनाला जास्त असते. या दोन पाण्यांच्या रासायनिक गुणधर्मामध्ये काडीचाही फरक नसतो. परंतु त्याचे भौतिक आणि जैविक गुणधर्म वेगळे असतात हे त्यांच्या वजनावरून दिसून यते. त्याचे शरीरावर होणारे परिणाम भिन्न असतात. त्यामुळे जड पाण्याने रिटाचा मृत्यू होते.

तात्पर्य, या कथासंग्रहातील सर्व कथांमध्ये वेगवेगळ्या विज्ञान विषयांच्या वापर केल्याचे दिसते. वेगवेगळ्या वैज्ञानिक शोधाचा व विज्ञान तंत्रज्ञानाचा कथेमध्ये अतिशय कौशल्याने वापर केल्याचे दिसते. स्पेक्ट्रोग्राफ, पेसमेकर, सेल्युलर फोन, स्लोग्लास खिडकी, ऱ्होडोडेन्ट्रॉन झाड, ॲक्टिव्हिटी टेस्ट, एलिमेंटरी पार्टिकल्स, हेवी वॉटर अशा वेगवेगळ्या विज्ञानसूत्राचा वापर केलेला दिसतो.

- **निष्कर्ष :-**

१) 'खिडकीलाही डोळे असतात' या विज्ञानकथासंग्रहाची रचनाशैली गूढ, रहस्यमय, उत्कंठावर्धक अशी आहे.

२) या कथासंग्रहामध्ये डॉ. बाळ फोंडके यांनी ओघवत्या, ललित्यपूर्ण भाषाशैलीचा वापर केल्याचे दिसते.

३) या विज्ञानकथांमध्ये हिंदी, इंग्रजी संवादाचा/भाषेचा जास्त वापर झालेला दिसतो.

४) या विज्ञानकथांमध्ये स्वार्थी, लोभी, खुनी, अशा विविध वृत्ती, प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा रेखाटलेल्या दिसतात.

५) या विज्ञानकथांमध्ये कथेची मांडणी, कलात्मकता, विज्ञानसूत्र या सर्वांचे सुरेख मिश्रण पाहायला मिळते.

## • संदर्भ ग्रंथ सूची •


१) डॉ.बाळ फोंडके : 'खिडकीलाही डोळे असतात.'

प्रकाशन - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

आवृत्ती - द्वितीयावृत्ती, ऑगस्ट २००६.